

# दामिनी

*** संकल्पना ***

**अरविंद चावरिया** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल

सहयोग

बुलडाणा अर्बन परिवार

# स्त्री शक्तीला सलाम



शारदा काणेकर

## 'स्व' सावरताना

ध्यास ऐसा स्वत्त्वाचा
माझा मलाच लागला
अनघड वाटेवरती
शोध माझा संपला

## बहुआयामी नायिका...

हे हात समर्थ पेलती
लीलया भूमिका विविधरंगी
कधी फळा, खडू, डस्टर
तर कधी साड्या नानारंगी



नीलिमा गाडे

**मुख्य कार्यालय** : सहकार सेतु, हुतात्मा गोरे पथ, बुलडाणा (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०७२६२) २४२७०५, २४३७०५

**संस्थेचे कार्यक्षेत्र**

● महाराष्ट्र ● राजस्थान ● मध्यप्रदेश ● छत्तीसगढ ● गुजरात ● अंदमान-निकोबार



**डॉ. सुकेश झंवर**
मुख्य कार्यकारी अधिकारी



**श्री. राधेश्याम चांडक**
संस्थापक अध्यक्ष



**सौ. कोमलताई झंवर**
अध्यक्षा

**Buldana Urban**
Co-op. Credit Society Ltd., Buldana

**बुलडाणा अर्बन**
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलडाणा

# दामिनी

♦ संकल्पना ♦

**अरविंद चावरिया** भा.पो.से.

पोलीस अधीक्षक, बुलडाणा

★★★

♦ संपादन ♦

**श्रीमती अलका भास्कर निकाळजे**

सहा. पोलीस निरीक्षक, भरोसा सेल, बुलडाणा

★★★

## बुलडाणा जिल्हा पोलीस दल

नियंत्रण कक्ष बुलडाणा : ०७२६२ - २४२४००

महिला हेल्पलाईन :- १०९१, ८६९८०००११

♦ सहयोग ♦

**बुलडाणा अर्बन परिवार**

♦ प्रकाशक ♦

**पोलीस अधीक्षक**

**बुलडाणा जिल्हा पोलीस दल**




♦ मुद्रणस्थळ ♦

**सौ. रागिणी अभय शास्त्री**

**ओंकार ग्राफिक्स ॲण्ड पब्लिकेशन**

कृष्णा, शास्त्री मोहल्ला, जालना

**मो. ९८२२०७५०२६, ८००७१७०८०८**

जनहितार्थ विनामूल्य वितरित

**Declaration :** ही पुस्तिका केवळ एक संदर्भ पुस्तिका असून यातील मजकूर कोणत्याही न्यायालयात अथवा कार्यालयात जशाचा तसा ग्राह्य नाही. त्याकरिता संबंधीत कायद्याचे पुस्तकाचा / शासन निर्णयाचा संदर्भ घेण्यात यावा.

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**अन्न व औषध प्रशासन**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*
दिनांक : २० जून २०२१



बुलडाणा जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्री. अरविंद चावरिया यांच्या संकल्पनेतून साकारलेली 'दामिनी' ही महिलांना कायदेविषयक माहिती व्हावी या हेतूने प्रकाशित होत असलेली पुस्तिका महिलांचा आत्मविश्वास वाढविणारी आहे.

राज्यात स्वातंत्र्यानंतर महिलांना समाजात सन्मानजनक वागणूकीचा अभावच जाणवतो. देशात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होतो. पूर्वी चार भिंतीएवढेच असणारे महिलांचे जग आता मात्र बरेच विस्तारले असून, सर्वच क्षेत्रात महिला आपल्या चांगल्या कामगिरीचा ठसा उमटवीत आहेत. शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य, उद्योग आदि विविध सार्वजनिक क्षेत्रात शहरी व ग्रामीण भागातही महिलांचा सहभाग वाढला आहे. पुरूषांच्या बरोबरीने महिलाही स्वकर्तुत्त्वाने सक्षम होण्यासाठी परिश्रम घेत आहेत. महिलांच्या स्वयंपूर्ण होण्याच्या प्रयत्नांना त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांना पुरेसे संरक्षण व सुरक्षितता समाजाने दिली पाहिजे. महिलांनी देखील त्यांना असलेले हक्क व त्यांच्या प्रगतीसाठी, त्यांच्यावरील अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी असलेल्या कायद्यांची माहिती करून घेऊन त्यांचा आधार घेतला पाहिजे. महिलाविषयक कायदे हक्कांची संपूर्ण माहिती देणारी दामिनी ही पुस्तिका बुलडाणा पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या वतीने प्रसिध्द केली जात आहे. ही अतिशय चांगली मार्गदर्शक पुस्तिका पोलीस अधिक्षक श्री. अरविंद चावरिया यांनी परिश्रम घेऊन कल्पकतेने तयार केली आहे. त्यांच्या परिश्रमांबाबत त्यांचे अभिनंदन..! या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा..!

**( डॉ. राजेंद्र शिंगणे )**

# मनोगत



आज देशभरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. ही एक चिंतेची बाब आहे.

राणी लक्ष्मीबाई, रझिया सुलतान सारख्या वीरांगनांच्या देशात, सावित्रीबाई फुलेंच्या देशात, जिजाबाईसारख्या आदर्श मातेच्या देशात, कल्पना चावलासारख्या अंतराळात जाऊन भिडणाऱ्या मुलीच्या देशात अत्याचार होतात ही बाब दुर्दैवाची आहे.


आज मुली, मुलांच्या बरोबरीने शिकून सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. इंजिनियर, डॉक्टर, वकील, पायलट, आयपीएस, आयएएस अधिकारी बनत आहेत. अंतराळात भरारी घेत आहेत. वैज्ञानिक व उद्योजक बनल्या आहेत, पण स्वतंत्र देशात त्या सुरक्षित नाहीत. का? त्याचे कारण त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. त्यांना आपल्या हक्कांची जाणीव नाही.

त्यांना कायद्याचे ज्ञान व्हावे. हक्कांची जाणीव व्हावी म्हणून आपले पोलीस खाते सदैव प्रयत्न करीत असते. महिलांना आपल्या हक्कांची जाणीव झाली तरच त्या आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध आवाज उठवू शकतील. अत्याचारांच्या विरूद्ध ठामपणे उभे राहण्याची मानसिकता तयार व्हायला हवी. शहरातील मुली सुशिक्षित आहेत पण त्याही अन्यायाविरूद्ध उभ्या राहत नाहीत. कारण बालपणापासून त्यांच्यावर मुलगी असल्याचा ठसा उमटविला जातो. आम्ही पोलीस खात्यातील लोक तर सदैव महिलांच्या पाठीमागे उभे आहोत. पण याबाबतीत जनतेत जागृती होणे अत्यावश्यक आहे. विशेषत: महिलांनी जागरूक व्हायला हवे यासाठी आम्ही

‘दामिनी’ ही पुस्तिका प्रसिद्ध करीत आहोत. यात महिलांचे हक्क महिलांविषयक कायदे, शासनाकडून पीडित महिलांसाठी देण्यात येणाऱ्या योजना, सायबर क्राईमबद्दल माहिती महिलांच्या सुरक्षिततेचे उपाय, याबद्दलची माहिती, पोलीस ठाण्यांचे दूरध्वनी क्रमांक, हेल्पलाईनची माहिती आहे. महिला गुन्हेविषयक कायदे, त्यात नवीन बदल कोणते झालेत हे सविस्तरपणे सांगितले आहे.

‘दामिनी’ ही पुस्तिका आम्ही जनहितार्थ प्रसिद्ध करीत आहोत. ही पुस्तिका विविध पोलीस स्टेशन व त्यांच्या हद्दीतील महिला मंडळ, महिला बचत गट, शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, सर्व शासकीय कार्यालये यांना वितरित करीत आहोत. उद्देश हा की ‘दामिनी’ व त्यातील माहिती महिलांपर्यंत पोहचावी. बुलडाणा पोलीस दलाच्या या उपक्रमांचे महिलांकडून स्वागत होईल हा विश्वास आहे. धन्यवाद!

**अरविंद चावरिया**
पोलीस अधीक्षक, बुलडाणा



# प्रस्तावना



८ मार्च १९०८ रोजी अमेरीकेतील न्यूयॉर्क शहरात एक ऐतिहासिक आंदोलन झाले. न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री कामगारांनी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस, कामाच्या जागी सुरक्षितता, मतदानाचा हक्क या मागण्या त्यांनी केल्या.

१९१० मध्ये कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत क्लारा झेटकीन यांनी ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून स्विकारावा असा ठराव मांडला व तो ठराव पास झाला. आपल्या भारत देशात ८ मार्च १९४३ रोजी मुंबई येथे पहिल्यांदा महिला दिवस साजरा करण्यात आला.

त्यापुर्वीही स्त्रीमुक्तीचा लढा सुरू होता आणि आजही हा लढा सुरूच आहे. आजची स्त्री शिक्षण, नोकरी, उद्योग, समाजकारण, प्रशासन, राजकारण, क्रीडा, कला अशा सर्वच क्षेत्रात आघाडीवर राहून आपला ठसा उमटवत आहे. स्त्रीने यशोशिखरे गाठली असली तरी तिचे जीवन अनेक समस्यांनी घेरलेले आहे. आजही वर्तमानपत्रे उघडताच स्त्रियांवरील अत्याचाराच्या बातम्यांनी वर्तमानपत्रे भरलेली दिसतात. कौटुंबिक हिंसाचार, स्त्रीभ्रुणहत्या, हुंडाबळी, बलात्कार, खून, अपहरण यासारख्या बातम्यांनी मन सुन्न होते. शेकडो वर्षांपासून स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. २१ व्या शतकातील आधुनिक म्हणविणाऱ्या समाजात स्त्रियांवरील गुन्हेगारीने दिवसेंदिवस अधिक भयावह रुप धारण केले आहे.

स्त्रियांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे अस्तित्त्वात आहेत. तसेच गुन्ह्यांच्या बदललेल्या स्वरुपानुसार अनेक नविन कायदे तयार करण्यात येतात. त्यात सुधारणा होतात आणि त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होते. परंतु तरीही स्त्रियांबद्दलच्या अपराधामध्ये दिवसेंदिवस वाढ होतांना दिसत आहे. बऱ्याच गुन्ह्यांमध्ये अगदी जवळची व्यक्तीच गुन्हेगार असल्याचे उघडकीस येते आहे. ज्यांच्यावर विश्वास टाकला त्यांनीच विश्वासघात केल्याच्या घटना घडत आहेत.

अशा वेळेस स्त्रियांनी कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत जेणेकरून त्यांना अपराधाच्या प्रसंगाला सामोरे जाण्याची वेळ येणार नाही यासाठी मा. चावरिया सर, पोलीस अधीक्षक बुलडाणा यांच्या संकल्पनेतील 'दामिनी' हे पुस्तक प्रसिध्द करीत आहोत. बुलडाणा पोलीस घटक महिलांच्या सुरक्षिततेसाठी सदैव कटिबध्द आहे. महिलांना त्यांच्याविषयीच्या कायद्याबद्दल माहिती व्हावी, त्यांच्या हक्कांबद्दल जागृती निर्माण व्हावी. शासनाकडून मिळणाऱ्या योजना माहित व्हाव्यात, विद्यार्थीनी व महिला यांना घराबाहेर पडतांना सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना कराव्यात तसेच सायबर क्राईम च्या संकटाला कसे तोंड द्यावे, अडचणीत सापडल्यावर कोणत्या नंबरवर फोन करावा. याबाबत सविस्तर माहिती 'दामिनी' या पुस्तकात सादर केली आहे.

स्त्रियांना भयमुक्त वातावरणात जगता यावे, त्या आत्मनिर्भर व्हाव्यात यासाठी 'दामिनी' हे पुस्तक घराघरात पोहचविण्याचा मानस आहे. या पुस्तकाचा प्रत्येक स्त्रीला प्रत्येक मुलीला निश्चितच फायदा होईल, असा विश्वास आहे.

**अलका भास्कर निकाळजे**
सहा. पोलीस निरीक्षक
भरोसा सेल, बुलडाणा

# आपण सर्व माणसं आहोत



आजकाल समाजात ज्या धक्कादायक घटना घडत आहेत त्या वाचल्या, त्यावरील प्रतिक्रिया पाहिल्या की मन उद्वेगाने भरून जाते. आपण माणूसच आहोत काय? अशी शंका येवू लागते. आपल्या बद्दलच शंका अशासाठी की इतके होत असूनही आपण काहीच करू शकत नाही आणि आपली भावना आपण योग्य तऱ्हेने व्यक्तही करू शकत नाही.

काही पैशासाठी खुन, चोऱ्या, अपघात.... या बातम्या नविन नाहीत आपल्याला हे रोजचेच. तसा अतिप्रसंग..., विनयभंग या बातम्या तरी नविन आहेत का? यापूर्वी अशा बातम्या वाचणात यायच्याच की, पण इतका टोकाचा अतिप्रसंग? त्यानंतरची निर्ढावलेली कृती... माणुसकी पासून किती तरी कोस दूर असलेली वृत्ती... काय आहे हे? कोठून आले हे सगळे? हे खरंच आपल्याच भारतात घडते आहे का? ही आपलीच मुलं आहेत का? हे आपलेच संस्कार आहेत का? आपल्या भारतीयांचे संस्कार हेच आहेत का?

'यत्र नारी पुजयन्त'......हे इथेच आहे.

विचार करून काही उपयोग नाही असे माहीत असेल तरी विचारांचे काहूर मनात उठतेच. कोणतीही अतिरेकी, अघटीत घटना संवेदनशिल मनावर ओरखडे उठवतेच. पण असे घडतेच कसे? ही वृत्ती का तयार होते? माणूस इतका वासनांध कसा होतो. सारासार विचार, परिणामांचा विचार का होत नाही? आपणही एक व्यक्ती आहोत – माणूस आहोत समोरील व्यक्तीही एक माणूस आहे हे पुर्णपणे विसरून जाण्याइतकी नशा प्रभावी असते त्या क्षणात पुरेपूर जगण्यासाठी असे मरणे आणि मारणे एवढे आवश्यक असते.

समाजात असणारं हे चित्रं निश्चित बदलायला पाहिजे त्यासाठी कोणीतरी सक्षम असे पाऊल उचलणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात, आपल्या राज्यात महिलांना दुय्यम प्रतिची वागणूक सतत मिळत आलेली

आहे. आजच्या आधुनिक काळात महिला पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहेत नव्हे एक पाऊल पुढे आहेत. महिलांनी असा अत्याचार का सहन करायचा त्यासाठी काही कायदेविषयक माहिती व्हावी म्हणून बुलडाणा जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्री. अरविंद चावरिया यांच्या संकल्पनेतून 'दामिनी' ही महिलांसाठी कायदेविषयक पुस्तिका तयार करण्यात आली आहे. महिलांच्या उन्नतीसाठी सर्वांगीन प्रगतीसाठी आणि पुरेसे संरक्षण व सुरक्षितता मिळण्याच्या दृष्टीने कोणते कायदे आहेत याबाबतची सखोल माहिती यात दिली आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या संदर्भात पोलीस यंत्रणा ही या समस्येसाठी फार मोठी सामाजिक दायित्त्व निभावणारी यंत्रणा आहे. कारण कायद्याच्या चौकटीत राहून कठोर कायदेशीर अंमलबजावणीची भूमिका या यंत्रणेलाच पार पाडावी लागणार आहे. स्त्रियांना सक्षम बनवण्यासाठी विविध कायदे, हक्क शासनाने दिले आहेत त्यात कौटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदे, हुंडा विरोधी कायदा, स्त्री अत्याचार विरोधी कायदा, अनैतिक मानवी वाहतूक विरोधी कायदा, अनैतिक व्यापार विरोधी कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, इत्यादी महिला विषयक कायदे शासनाकडून पिडीत महिलांसाठी देण्यात येणाऱ्या योजना, सायबर क्राईमबद्दल माहिती महिलांच्या सुरक्षिततेचे उपाय याबद्दलची सविस्तर माहिती 'दामिनी' या पुस्तिकेमध्ये दिलेली आहे. अत्याचार सहन करणारा व अत्याचार करणारा हे दोघेही तेवढेच गुन्हेगार असतात. निसर्गाने स्त्री ही मुळातच सहनशिल बनविली आहे. काळाच्या ओघात कुटुंब संस्थेचा विकास होत असताना महिलांचे कार्यक्षेत्र संकुचीत होत गेले. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या स्विकारतांना समाजातले मूल्यही हरवत गेले. अनेक रुढी, परंपरेच्या नावाखाली स्त्री हा घटक बळी ठरत गेला. म्हणून स्त्रीयांना जागृत करण्यासाठी दामिनीसारख्या उपक्रमाची नितांत आवश्यकता आहे. जेणेकरून आपले अधिकार काय, आपली सुरक्षितता संबंधीचे कायदे काय आहेत याची जाणीव करून देण्यासाठी हा स्तुत्य उपक्रम पोलीस अधिक्षक यांनी राबवीला आहे. ही सर्व माहिती समाजातील सर्व महिलांपर्यंत पोहचावी आणि हे जनसेवेचे व्रत असेच पुढे अखंड सुरू राहावे यासाठी मी मनापासून शुभेच्छा देतो...!

**राधेश्याम चांडक**

अध्यक्ष, बुलडाणा अर्बन, बुलडाणा

# महिलांसंबधीचे कायदे व नियम

निसर्गाने स्त्री ही मुळातच सहनशील बनवली आहे. काळाच्या ओघात कुटुंबसंस्थेचा विकास होत असताना महिलांचे कार्यक्षेत्र संकुचित होत गेले. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या स्वीकारतांना समाजतले मूल्यही हरवत गेले. अनेक रूढी, परंपरेच्या नावाखाली स्त्री हा घटक बळी ठरत गेला. आजच्या आधुनिक म्हणविणाऱ्या समाजातही पुरूषप्रधान मानसिकता स्त्रियांना एक माणूस, समाजाचा घटक म्हणून स्वीकारतांना दिसून येत नाही. स्त्रीभ्रूण हत्येपासून ते पैशांसाठी, चारित्र्यावरून तिचा जीव घेण्यापर्यंत समाजात घटना घडत आहेत. म्हणून महिलांसंबंधीचे अनेक कायदे,अटी नियम बनवावे लागले. स्वातंत्र्यापूर्वी सतीप्रथा बंदीचा कायदा बनवला गेला. नंतर काळानुरूप महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक कायदे अटी, नियम बनवले गेले आहेत. याची भारताचा एक नागरिक म्हणून प्रत्येक स्त्री व पुरूषाला माहिती असणे गरजेचे आहे.






# भारतीय राज्यघटना

भारतीय राज्यघटना भारतीय नागरिकांमध्ये स्त्री–पुरूष असा भेद करत नाही. कायद्यासमोर समानता हे भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्य आहे. भारतीय राज्यघटनेतील काही कलमे पुढीलप्रमाणे :–

## महिलांसंबधीचे कायदे, अटी व नियम

भारतीय राज्यघटनेत सर्व व्यक्तींची प्रतिष्ठा राखण्यासाठी शाश्वती दिली आहे. तसेच राज्यघटनेतील काही कलम स्त्री–पुरूष समानता संदर्भात आहेत. उद्देश पत्रिकेमध्ये दिलेली आहेत.

१) **अनुच्छेद क्र.१४–समतेचा अधिकार–**कायद्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला समान गृहीत धरून कायद्याने समान संरक्षण देण्यात आले आहे.

२) **अनुच्छेद क्र.१५ अन्वये:–** स्त्री व पुरुष या आधारावर कोणताही **भेदभाव** केला जाणार नाही.

३) **अनुच्छेद क्र. १६ अन्वये :–** सर्वांना **समान संधी** प्राप्त असून स्त्री–पुरुष या आधारावर कोणालाही एखाद्या नेमणुकीपासून वंचित ठेवता येणार नाही. स्त्री आणि पुरुषाला कामासाठी समान वेतन दिले जावे.

४) **अनुच्छेद ३९(ड) अन्वये:–** मजुरी करणाऱ्या स्त्री–पुरुषांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होईल असे काम करण्यास भाग पाडू नये, स्त्री आणि पुरुषाला कामासाठी **समान वेतन** दिले जावे.

५) **अनुच्छेद क्र.४२ अन्वये:–** स्त्रीला प्रसूतीच्या वेळी योग्य ते फायदे मिळतील अशी व्यवस्था शासनाने करावी असे तत्त्व आहे.

६) **अनुच्छेद क्र. ५१क (ङ) अन्वये :–** स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधक ठरेल अशा प्रथा मोडणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य समजले गेले आहे.

# भारतीय दंड विधान



भारतीय दंडविधान हे भारतीय नागरिकाने केलेल्या गुन्हेगारी कृत्याची व्याख्या आणि त्याची शिक्षा सांगणारा कायदा आहे. महिलांच्या गुन्ह्यासंदर्भातील खालील काही महत्त्वाचे कलमे आहेत. ते खालीलप्रमाणे

**शरीराचा खासगीरीत्या बचाव करण्याचा हक्क**

## कलम ९६ ते १००

प्रत्येक नागरिकाला खासगीरीत्या स्वत:च्या शरीराचा व मालमत्तेचा तसेच इतरांच्या शरीराचा व मालमत्तेचा बचाव करण्याचा हक्क दिलेला आहे. कलम १०० प्रमाणे बलात्कार, अनैसर्गिक लैंगिक वासनापूर्ती किंवा अपहरण करण्याच्या इराद्याने केलेल्या हल्लेखोराचा मृत्यू घडवून आणेपर्यंत हक्क खालील मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे.

१) ज्या कृत्याविरूद्ध हक्क वापरण्यात आले आहे. ते कृत्य कायद्याप्रमाणे अपराध आहे.

२) बचाव करण्यासाठी वापरलेले बळ हे योग्य प्रमाणात असावे.

३) पळून जात असलेल्या हल्लेखोरावर हक्क बजावता येत नाहीत.

४) बचाव करणाऱ्या इसमास तो लोक प्रतिबंध करण्याकडे जाणे शक्य होणार नाही अशी परिस्थिती असणे.

५) कलम १०६ प्रमाणे सदर कृत्य बजावत असताना कित्येक वेळेस निर्दोष व्यक्तींना अपाय होण्याचा व तसा धोका पत्करल्याशिवाय तो हक्क परिणामकारक वापरता येत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास सदर हक्क बजावता येतो.

**● कलम २२८ (अ), ३७६ (अ,ब,क,ड,ग) भा.दं.वि. बळी पडलेल्या व्यक्तीचे नाव किंवा मजकूर मुद्रित किंवा प्रकाशित करण्यास बंदी घातली आहे.**

लैंगिक अत्याचार झालेल्या महिलांना समाजात स्वत:चे नाव बदनाम होण्याची जास्त भीती वाटत असते. त्यामुळे भारतीय दंडसंहितेतील २२८ कलम हे अत्यंत महत्त्वाचे आहे.



# गर्भपातासंबंधी कलम भा.दं.वि. ३१२ ते ३१८

- **कलम ३१२ :–** गर्भस्त्राव होत असेल तर जीव वाचविण्यासाठी गर्भपात करणे गुन्हा नाही परंतु गर्भस्त्राव नसताना गर्भपात करणे गुन्हा आहे.

**शिक्षा :** ७ वर्षे व दंड

- **कलम ३१३ :–** स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात घडवून आणणे गुन्हा आहे.

**शिक्षा :** जन्मठेप किंवा १० वर्षे व दंड

- **कलम ३१४ :–** गर्भपात घडवून आणण्याच्या उद्देशामुळे स्त्रीचा मृत्यू घडवून आणणे हा अपराध आहे.

**शिक्षा :** १० वर्षे व दंड

- **कलम ३१५ :–** मूल जिवंत जन्मण्यास प्रतिबंध केल्यास किंवा जन्मानंतर त्याचा मृत्यू घडवून आणणाऱ्याकरिता केलेली कृती.

**शिक्षा :** १० वर्षे किंवा दंड

- **कलम ३१६ :–** सदोष मनुष्य वधाबद्दल दोषी होऊ शकेल. अशा कृतीमुळे स्पंदन पावणाऱ्या अजाण गर्भ जिवाच्या मृत्यू घडवून आणणे अपराध आहे.

**शिक्षा :** १० वर्षे व दंड

- **कलम ३१७ :–** नवजात बालकास उघड्यावर टाकून त्याचा परित्याग करणे.

**शिक्षा :** ७ वर्षे किंवा दंड

- **कलम ३१८ :–** गुप्त रीतीने प्रेताची विल्हेवाट लावून मूल जन्मल्याची माहिती गुप्त ठेवणे.

**शिक्षा :** २ वर्षे किंवा दंड किंवा दोन्ही

# विनयभंग



**१) कलम ३५४ ची सुधारणा:-**

आधी कलम ३५४ मध्ये दोन वर्षाचा कारावास किंवा द्रव्यदंड अथवा दोन्ही शिक्षेस पात्र अशी तरतूद होती. आता यात सुधारणा करून गुन्हेगारास १ वर्षापेक्षा कमी नसणे व पाच वर्षांपर्यंत शिक्षा होईल व द्रव्यदंडही होईल.

**२) कलम ३५४ मध्ये ३५४-अ, ३५४-ब, ३५४-क व ३५४-ड समाविष्ट करणे.**

**३५४-अ:- पुरुषाला लैंगिक छळवणूक व लैंगिक छळवणुकीसाठी शिक्षा-**

१) एखादा पुरुष अवांछनीय लैंगिक सूचना, शारीरिक स्पर्श, मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न करणे.

२. लैंगिक अनुग्रहाची मागणी, इच्छेविरूद्ध संभोग करणे.

३. महिलेच्या इच्छेविरुद्ध अश्लील पुस्तक दाखविणे

४. अश्लील टोमणा मारणे.

**३५४-ब :- विवस्त्र करण्याच्या उद्देशाने महिलेवर हल्ला करणे किंवा फौजदारी बळाचा वापर करणे.**

कोणत्याही महिलेला एकांतात वा सार्वजनिक ठिकाणी नग्न होण्यास भाग पाडील, तिच्यावर हल्ला करून किंवा फौजदारी बळाचा वापर करून असे कृत्य करणाऱ्यास अपप्रेरणा देईल, अशा गुन्हेगारास तीन वर्षांपेक्षा कमी नसेल व सात वर्षांपर्यंत वाढविता येईल असा कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा होईल.



**३५४–क :–** दुसऱ्या व्यक्तीला नग्न असताना किंवा लैंगिक क्रीडा करीत असताना त्यांना चोरून पाहणे व त्याद्वारे लैंगिक समाधान मिळविण्याची विकृती अशा विकृत गुन्हेगाराला १ वर्षापासून तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा, द्रव्यदंडासहित प्राप्त होईल.





**३५४–ड :– छुपा पाठलाग करणे**

एखाद्या स्त्रीने तिला आस्था नसल्याचे स्पष्टपणे सांगितले तरी वैयक्तिक परिचय वाढवण्यासाठी महिलेचा पाठलाग करणे व तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करणे.

इंटरनेटच्या, ई–मेलच्या किंवा इलेक्ट्रॉनिक संदेश वहनांद्वारे संपर्काचा प्रयत्न करणे. अशा गुन्हेगारास तीन ते पाच वर्षांपर्यंत कारावास व द्रव्यदंडही होऊ शकतो. याला अपवाद असेल.

अ) गुन्ह्याच्या प्रतिबंधासाठी किंवा तपासासाठी पाठलाग करणे.

ब) विशिष्ट परिस्थितीत संयुक्तिक व समर्थनीय असा छुपा पाठलाग होत आहे, हे सिद्ध झाले तर.

**भादंवि कलम २९४–** सार्वजनिक ठिकाणी अश्लील कृती करणे हा गुन्हा आहे.

**भादंवि कलम ५०९–** महिलेच्या संबंधाने शब्द उच्चारणे अथवा हातवारे करणे ज्यामुळे महिलेचा विनयभंग होऊ शकतो. त्यास ३ वर्षे कैद, दंड किंवा दोन्ही शिक्षा.



**गुन्हा –** दखलपात्र, अजामीनपात्र व कोणत्याही न्यायालयात चालणारा.

# ॲसिड हल्ला



**३२६ अ –**

ॲसिड इत्यादीचा वापर करून गंभीर दुखापत करणे.

(यात ॲसिड फेकून शारीरिक इजा करणे वा ॲसिड पाजणे)

अशा गुन्हेगारास दहा वर्षे कारावास वा आजीवन कारावास होऊ शकेल. त्याला द्रव्यदंड होईल तो पैसा पीडिताला देण्यात येईल.

**३२६ ब– ॲसिड फेकणे किंवा फेकण्याचा प्रयत्न करणे –**

यात ॲसिड फेकण्याचा प्रयत्न केल्यामुळे दुखापत झालेली व्यक्ती तात्पुरती वा कायमस्वरुपी विकलांग झाली तर गुन्हेगारास पाच ते सात वर्षाचा कारावास व द्रव्यदंडही होईल.



*बेटी भार नहीं, हैं आधार । जीवन हैं उसका अधिकार ।।*

*शिक्षा हैं उसका हथियार । बढाओ कदम, करो स्वीकार ।।*

**बेटी बचाओ - बेटी पढाओ ।**

# बलात्कार



## भादंवि कलम ३७५

खालील प्रकारात बलात्कार केला असे समजले जाईल

**अ)** जर त्याने त्याचे लिंग योनी, तोंड, मूत्रमार्ग अथवा गुदद्वारमध्ये प्रवेशित केले अथवा त्याच्यासोबत अथवा इतर व्यक्तीसोबत असे कृत्य करावयांस लावणे.

**ब)** लिंगाव्यतिरिक्त इतर वस्तू योनी, तोंड, मूत्रमार्ग अथवा गुदद्वारामध्ये प्रवेशित केले अथवा त्याच्यासोबत अथवा इतर व्यक्तीसोबत असे कृत्य करावयांस लावणे.

**क)** महिलेसोबत लबाडी करून योनी, तोंड, मूत्रमार्ग अथवा गुदद्वारमध्ये प्रवेशित केले अथवा त्याच्यासोबत अथवा इतर व्यक्तीसोबत असे कृत्य करावयांस लावणे.

**ड)** महिलेच्या योनी, गुदद्वार, मूत्रमार्गास तोंड लावणे अथवा तिला त्याच्यासोबत अथवा इतर व्यक्तीसोबत तसे करावयास लावणे.

**भादंवि कलम ३७६ –**

१) १० वर्षांपेक्षा कमी नाही परंतु जन्मठेपेपर्यंत शिक्षा आणि द्रव्यदंड

२) जो कोणी



**ए) पोलीस अधिकारी असताना बलात्कार करील**

१) ज्या भागात तो पोलीस अधिकारी म्हणून नेमणुकीस आहे अथवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत. (फौजदारी कायदा २०१८ (दुरुस्ती) अधिनियमानुसार वगळण्यात आले.)

२) पोलीस ठाण्याच्या परिसरात.

३) पोलीस अधिकाऱ्याच्या कोठडीत असलेली महिला अथवा त्याच्या कनिष्ठ अधिकाऱ्याच्या कोठडीत असलेली महिला.

**बी) लोकसेवक** म्हणून असताना त्याच्या ताब्यात असलेल्या महिलेवर बलात्कार करणे अथवा त्याच्या कनिष्ठ लोकसेवकाच्या ताब्यात असणाऱ्या महिलेवर बलात्कार करणे.

**सी) सशस्त्र दलाच्या** सदस्याने त्याच्या नेमणुकीच्या हद्दीत.

**डी) जेल कर्मचारी, रिमांड होम** अथवा इतर ठिकाणच्या व्यवस्थापकाने त्याच्यासोबत असणाऱ्या महिलेवर बलात्कार करणे

**ई) दवाखान्याच्या व्यवस्थापकाने** बलात्कार करणे.

**एफ) नातेवाईक, पालक अथवा शिक्षक** अथवा विश्वासू व्यक्तीने बलात्कार करणे.

**जी) जातीय व धार्मिक दंग्यांमध्ये बलात्कार करणे.**

**एच) महिला गरोदर असताना तिच्यावर बलात्कार करणे.**

**आय)** स्त्री ही १६ वर्षांखालील असताना बलात्कार करणे.

**जे)** संमती देण्याच्या परिस्थितीत नसणाऱ्या महिलेवर बलात्कार करणे.

**के)** महिलेवर प्रभुत्व अथवा नियंत्रण असणाऱ्या व्यक्तीने बलात्कार करणे.

**एल) शारीरिक व मानसिक व्यंग असणाऱ्या महिलेवर** बलात्कार करणे.

**एम)** बलात्कार करीत असताना त्या महिलेस गंभीर दुखापत अथवा जिवास घातक होईल अशी इजा करणे.

**एन) महिलेवर सतत बलात्कार करणे**

**१० वर्षांपेक्षा कमी नाही परंतु जन्मठेपेपर्यंत शिक्षा.**



**१६ वर्षांखालील महिलेवर बलात्कार केल्यास २० वर्षांपेक्षा कमी नाही परंतु आजीवन सश्रम कारावास म्हणजे त्या व्यक्तीच्या जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत असा असेल आणि द्रव्यदंड (दुरूस्ती अधि. २०१८)**



## भादंवि कलम ३७६ (ए) -

**बलात्कार करणे किंवा जखमी करणे ज्यामुळे पीडित** महिलेचा मृत्यू होऊ शकतो. त्यास २० वर्षे ते जन्मठेपेपर्यंत शिक्षा.

**गुन्हा –** दखलपात्र, अजामीनपात्र व सत्र न्यायालयात चालणारा.

## भा.दं.वि. कलम ३७६ (ए बी)

**१२ वर्षांखालील महिलेवर बलात्कार,** त्यास २० वर्षे ते जन्मठेपेपर्यंत शिक्षा आणि द्रव्यदंड

## भादंवि कलम ३७६ (बी)-

न्यायालयीन आदेशाने वेगळे झाले असताना पतीने पत्नीवर बलात्कार करणे त्यास २ वर्षे ते ७ वर्षांपर्यंत शिक्षा.

**गुन्हा –** दखलपात्र, अजामीनपात्र व सत्र न्यायालयात चालणारा.

## भादंवि कलम ३७६ (सी)-

अधिपत्याखाली असलेल्या महिलेवर बलात्कार करणे त्यास ५ वर्ष ते १० वर्षांपर्यंत शिक्षा.

**गुन्हा –** दखलपात्र, अजामीनपात्र व सत्र न्यायालयात चालणारा.

## भादंवि कलम ३७६ (डी) -

सामूहिक बलात्कार करणे त्यास २० वर्षे ते जन्मठेपे पर्यंत शिक्षा.

**गुन्हा –** दखलपात्र, अजामीनपात्र व सत्र न्यायालयात चालणारा.



### बलात्कार पीडितांनी घ्यावयाची दक्षता

- आरोपींनी वापरलेली वस्तू जसे दारू, बिडी सिगारेट, गुटखा ई. निदर्शनास आणून द्याव्यात.
- घटनेनंतर वापरलेले कपडे धुऊ नयेत.
- घटनेवेळी झालेली जखम धुऊ नये.
- घटनेनंतर मेडीकल होईपर्यंत आंघोळ करू नये.

### भादंवि कलम ३७६ डी ए -

१६ वर्षांखालील महिलेवर बलात्कार त्यास जन्मठेपेपर्यंत शिक्षा आणि द्रव्यदंड.

### भादंवि कलम ३७६ डी बी -

१२ वर्षांखालील महिलेवर बलात्कार – त्यास जन्मठेपेपर्यंत शिक्षा आणि द्रव्यदंड किंवा मृत्युदंड

### भादंवि कलम ३७६ (ई)-

परत बलात्काराचा गुन्हा करणे त्यास जन्मठेपेची शिक्षा.

**गुन्हा –** दखलपात्र, अजामीनपात्र व सत्र न्यायालयात चालणारा.

## अपहरणासंबंधी



- कलम ३६३:– पळवून नेण्याबाबतचा अपराध.
- कलम ३६१ ते ३६२:– कायदेशीर रखवालीतून चोरून नेणे किंवा पळवून नेणे.
- कलम ३६६:– सक्तीने विवाह करणे किंवा संभोग करणे इत्यादींची सक्ती करण्यासाठी पळवून नेणे किंवा अपहरण करणे.
- कलम ३६६(अ):– अज्ञान मुलगी अपहरणासाठी पळविणे हा अपराध आहे.
- कलम ३६६(ब):– परकीय देशांतून गैरकामांसाठी मुलींची आयात करणे.



# फौजदारी प्रक्रिया संहिता

● **कलम ५४-अ ची सुधारणा :**

जर अटक झालेल्या अपराध्यास ओळखणारी व्यक्ती मानसिक शारीरिकदृष्ट्या असमर्थ असेल तर ओळख पटविण्याची प्रक्रिया न्यायदंडाधिकाऱ्याच्या देखरेखीखाली होईल. या व्यक्तीकडून सोयीस्कर पध्दतीने ओळख पटविण्याचे कार्य करण्यात येईल.

पण जर ही ओळख पटविणारी व्यक्ती मानसिक व शारीरिकदृष्ट्या विकलांग असेल तर ही प्रक्रिया व्हिडिओग्राफीद्वारे करण्यात यावी.

● **कलम १२५ (पोटगी) :**

जर एखादा पती स्वतःची ऐपत असूनही बायकोस पोसण्याची जबाबदारी नाकारत असेल किंवा तिला अन्न, वस्त्र देण्याबाबत हयगय करत असेल तर अशा पतीकडून पोटगी मागता येते.

या कलमांखाली दरमहा किमान मर्यादा कायद्याने काढून टाकली आहे. हा कायदा सर्व भारतीयांना लागू आहे.

**पोटगी कधीपर्यंत मिळते?**

- पोटगी घेणारा व्यक्ती जिवंत असेपर्यंत.
- अर्जदाराने दुसरा विवाह करेपर्यंत.

● **फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १५४ ची सुधारणा**

१) अपराध किंवा अपराधाचा प्रयत्न जिच्या बाबतीत करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले असेल अशा स्त्रीने वर्दी दिली असेल तर **अशी वर्दी महिला पोलीस अधिकाऱ्याने किंवा अन्य महिला अधिकाऱ्याने लिहून घेतली पाहिजे.**

२) मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग स्त्रीबाबत पोलीस अधिकारी ज्या व्यक्तीने ही बातमी दिली आहे **त्याच्या घरी किंवा त्याने सांगितलेल्या स्थळी जातील दुभाषी किंवा विशेष शिक्षण देणाऱ्याच्या उपस्थित जो गुन्हा घडला आहे त्याची सर्व माहिती लिहून घेतील.**

३) अशा घटनेचे दृक्श्राव्य चित्रण (व्हिडिओग्राफ) घेतले जाईल.

४) न्याय दंडाधिकाऱ्याने **पीडित व्यक्तीचा जबाब शक्य तितक्या लवकर नोंदवतील.**

५) तक्रारीची एक प्रत वर्दीदाराला (तक्रारदाराला) तात्काळ विनाशुल्क देण्यात येईल.

६) पोटकलम (१) मध्ये नोंदवलेली गेलेली वर्दी नोंदविण्यास पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याने नकार दिल्यामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीस लेखी स्वरूपात तक्रार पोस्टाने संबंधीत पोलीस अधीक्षकाकडे पाठविता येईल.

वरील नमूद महिला अत्याचारांच्या गुन्ह्यासंदर्भाने दिलेली माहिती फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १५४ (१) नोंदवून घेण्यास कसूर करील असे पोलीस अधिकारी भारतीय दंडसंहिता १८६० चे कलम १६६ (अ) प्रमाणे गुन्हा केल्याचे दोषी राहतील.

- **कलम १६० ची सुधारणा :**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६० मधील पोटकलम (१) मधील 'परंतु १५ वर्षाखालील पुरूष व्यक्तीला किंवा महिलेला या मजकुराऐवजी '१५ वर्षे वयाखालील किंवा पासष्ट वर्षे वयावरील कोणतीही महिलेला शारीरिक किंवा मानसिक दृष्ट्या विकलांग असलेल्या व्यक्तीला'' असा मजकूर दाखल करण्यात येईल.

- **कलम १६१ ची सुधारणा :**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६१ मध्ये पोटकलम (३) मध्ये परंतुकामध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल.

ज्या महिलेच्या विरूध्द भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३५४, कलम ३५४-अ, कलम ३५४-ब, कलम-३५४-क, कलम ३५४-ड, कलम ३७६-अ, अ ब, कलम ३७६-ब, कलम ३७६-क, कलम-३७६-ड, ड अ, ड ब, कलम-३७६-इ किंवा कलम ५०९ अपराध केला असल्याचे अभिकथन केले आहे. अशा महिलेचा जबाब महिला पोलीस अधिकाऱ्याद्वारे किंवा कोणत्याही महिला पोलीस अधिकाऱ्याद्वारे नोंदविण्यात येईल.

- **कलम १६४ ची सुधारणा :**

भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३५४, ३५४–अ, ३५४–ब, ३५४–क, ३५४–ड, कलम ३७६, ३७६–अ, ३७६–ब, ३७६–ड, ३७६–इ किंवा कलम ५०९ खालील शिक्षापात्र असलेल्या प्रकरणी न्याय दंडाधिकारी, ज्या व्यक्तीविरूध्द असा अपराध करण्यात आला आहे त्या व्यक्तीचा जबाब, अपराध घडल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आल्याबरोबर, पोटकलम (५) मध्ये विहित केलेल्या रीतीने नोंदवील.

जर जबाब देणारी व्यक्ती तात्पुरती वा कायमस्वरूपी विकलांग असेल तर दंडाधिकारी जबाब नोंदवितांना दुभाषी किंवा विशेष शिक्षकांचे साहाय्य घेईल. वरीलप्रमाणे जबाब घेता आल नाही तर व्हिडीओग्राफीत जबाब भारतीय साक्षीपुरावा अधिनियम १८७२ (१८७२ चा १०) याच्या कलम १३७ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सरतपासणीऐवजी जबाब असल्याचे विचारात घेण्यात येईल. म्हणजे असे की जबाब देणारी व्यक्ती न्यायचौकशीच्या वेळी जबाब न नोंदविता अशा जबाबावरून उलटतपासणी घेऊ शकते.

- **कलम १९७ ची सुधारणा :**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ मधील पोट–कलम (१) नंतर पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल. स्पष्टीकरण : भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) कलम १६६–अ, कलम १६६–ब, कलम–३५४, ३५४–अ, ३५४–ब, ३५४–क, ३५४–ड, कलम ३७६, ३७६–अ, ३७६–ब, ३७६–क, ३७६–ड, ३७६–इ किंवा कलम ५०९ खालील कोणताही अभिकथित अपराध केला असल्याचा आरोप असलेल्या लोकसेवकाच्या बाबतीत मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

- **१९८–ब अपराधाची दखल घेणे :**

जेव्हा पतीविरूध्द पतीने केलेल्या तक्रारीत जी तथ्ये अपराध ठरवितात. त्यांची खात्री पटल्याशिवाय भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३७६–ब खालील अपराधाची दखल घेणार नाही.

## ● कलम २७३ ची सुधारणा :

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २७३ मध्ये स्पष्टीकरणापूर्वी पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल.

जी महिला बलात्काराची किंवा अन्य लैंगिक अपराधाची शिकार झाली असल्याचे अभिकथन केले आहे. व ती अठरा वर्षांखालील असेल तर तिचा साक्षी पुरावा नोंदवायचा असेल तर न्यायालय अशा महिलेला आरोपीसमोर आणणार नाही. त्या आरोपीची उलट तपासणी घेण्याच्या हक्काची खात्री करण्याची देखील यथोचित उपाययोजना करू शकेल.

## ● कलम ३०९ ची सुधारणा :

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ मधील पोटकलम (१) ऐवजी पुढील पोटकलम दाखल करण्यात येईल.

प्रत्येक चौकशी वा न्यायचौकशीत न्यायालयात नोंदवायच्या कारणांसाठी दररोजची कार्यवाही पुढच्या दिवसानंतर संस्थगित करणे आवश्यक असल्याचे आढळून आल्याशिवाय, उपस्थित असलेल्या सर्व साक्षीदारांची दररोज तपासणी करण्यात येईपर्यंत कार्यवाही नियमितपणे चालविण्यात येईल. पण जेव्हा चौकशी वा न्यायचौकशी दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३७६, ३७६–अ, ३७६–ब, ३७६–क, ३७६–ड, खालील अपराधाशी संबंधीत असेल तेव्हा उपरोक्त चौकशी शक्यतो दोषारोपपत्र दाखल केल्यापासून दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येईल.

## ● नवीन कलम ३५७–ब, व ३५७–क समाविष्ट करणे :

कलम ३५७–अ नंतर पुढील कलमे वाचावीत फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७–अ नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील.

## ● कलम ३५७–ब :

भारतीय दंडसंहितेच्या कलम ३२६–अ किंवा कलम ३७६–ड खालील द्रव्य दंडाव्यतिरिक्त नुकसान भरपाई असणे. कलम ३५७–अ च्या अन्वये राज्य राज्य शासनाद्वारे प्रदेय असलेली नुकसान भरपाई ही भारतीय दंडसंहितेच्या (१८६० चा ४५) यांच्या कलम ३२६–अ किंवा कलम ३७६–ड अन्वये पीडित व्यक्तीस द्रव्य दंडाचे प्रदान करण्याव्यतिरिक्त असेल.

● **कलम ३५७–क पीडित व्यक्तींचा उपचार :**

सर्व सार्वजनिक किंवा खासगी रुग्णालये ती केंद्र, राज्य शासन, स्थानिक संस्था किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे चालविण्यात येत असते. भारतीय संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३७६, ३७६–अ, अब, ३७६–ब, ३७६–क, ३७६–ड, डअ, डब, ३७६–ई. खाली समाविष्ट असलेल्या कोणत्याही अपराधाच्या पीडित व्यक्तीस तातडीने मोफत प्रथमोपचार किंवा वैद्यकीय उपचार पुरवील.

## भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२

● **कलम ५३–अ समाविष्ट करणे :**

भारतीय दंडसंहितेच्या कलम ३५४, ३५४–अ, ३५४–ब, ३५४–क, ३५४–ड, कलम ३७६–अ, अब, ३७६–ब, ३७६–क, ३७६–ड, डअ, डब, ३७६–इ खालील अपराधाच्या किंवा अपराध करण्याच्या अभियोगामध्ये जेव्हा संमतीचा प्रश्न निर्माण होईल तेव्हा पीडित व्यक्तीच्या चारित्र्याचा किंवा अशा व्यक्तीच्या कोणत्याही व्यक्तीबरोबर असलेल्या पूर्व लैंगिक अनुभवांचा साक्षीपुरावा, अशा संमतीच्या गुणवत्तेच्या प्रश्नाच्या बाबतीत संबंध असणार नाही.

● **कलम १५३–अ ऐवजी नवीन कलम दाखल करणे :**

**(मुळ कलम ११४–अ ऐवजी पुढील कमल वाचावे) :**

भारतीय साक्षी पुरावा अधिनियमाच्या कलम ११४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल. ११४–अ लैंगिक हमल्याच्या विवक्षित अभियोगामध्ये संमतीचा अभाव असण्याविषयीचे गृहीतक–भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३७६ च्या पोटकलम (२) च्या खंड (अ), खंड (ब), खंड (क), खंड (ड), खंड (फ), खंड (ग), खंड (ह), खंड (आय), खंड (ज), खंड (के) खंड (ल) खंड (म) किंवा खंड (न) खालील बलात्काराच्या अभियोगामध्ये जेव्हा आरोपीने केलेला संभोग सिध्द झाला असेल आणि बलात्कार करण्यात आला असल्याचे अभिकथन केलेल्या महिलेची संमती होती किंवा कसे असा प्रश्न असेल आणि अशा महिलेने अशा व्यक्तीस संमती दिली गृहीत धरील की, तिने संमती दिली नव्हती.

● **कलम ११९ ऐवजी नवीन कलम दाखल करणे :**

(मुळ कलम ११९ ऐवजी पुढील कलम वाचावे.)

● **कलम ११९ तोंडी स्वरूपात संदेश देण्यास असमर्थ असलेल्या साक्षीदार :**

मुक्या असलेल्या साक्षीदाराकडून न्यायालयाच्या लेखनाद्वारे किंवा खुणांद्वारे साक्ष देण्यात येईल अशा प्रकारची साक्ष तोंडी मानण्यात येईल.

जर साक्षीदार तोंडी स्वरूपात संदेश देण्यास असमर्थ असेल तर न्यायालय जबाब नोंदवून घेतांना दुभाषीचे किंवा विशेष शिक्षकाचे साहाय्य घेईल आणि अशी जबानी व्हिडिओग्राफिक करण्यात यावी.

● **कलम १४६ ची सुधारणा :**

कलम ३७६, ३७६–अ, ३७६–ब, ३७६–क, ३७६–ड, ३७६–इ खालील अपराधाच्या किंवा असा कोणताही अपराध केल्याच्या प्रयत्नांच्या अभियोगामध्ये जेव्हा संमतीचा प्रश्न उपस्थित होईल तेव्हा, अशी संमती किंवा संमतीची गुणवत्ता सिध्द करण्यासाठी पीडित व्यक्तीच्या सर्वसाधारण अनैतिक चारित्र्यासंबंधी किंवा अशा पीडित व्यक्तीच्या कोणत्याही व्यक्तीबरोबर असलेल्या पूर्वीच्या लैंगिक अनुभवांसंबंधीचा पुरावा दाखल करण्यात किंवा पीडित व्यक्तीस उलटतपासणीमध्ये प्रश्न विचारण्यास परवानगी असणार नाही. (असे साक्षीपुरावा अधिनियमाच्या कलम १४६ मध्ये परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल.)

● **महाराष्ट्र पोलीस अधिनियम–१९५१**

कलम ६८ :– पतीस पत्नीला चांगले वागविण्यासाठी आदेश देता येतो.

कलम ११० :– सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन करणे (शिक्षा कलम ११७)



**मुलांना कधीच पोलिसांची भीती घालू नका. नाही तर आयुष्यभर ते पोलिसांना घाबरतच राहतील... मुलांना सांगा की, पोलीस त्यांच्या मदतीसाठी आहेत, त्यांच्या संरक्षणासाठी आहेत.**

# गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा सुधारित २००३



गर्भपात करणे हा गुन्हा आहे. याला आळा घालण्यासाठी १९९४ पासून प्रसवपूर्ण निदान तंत्र दुरूपयोग प्रतिबंध कायदा लागू झाला आहे.

**उद्देश –** या कायद्याचा उद्देश प्रामुख्याने हा आहे की सोनोग्राफीद्वारे गर्भाची स्थिती पाहता यावी. गर्भाची लिंगतपासणी होऊ नये. मुलींची गर्भातच भ्रूण हत्या होऊ नये, फक्त गर्भातील भ्रूणाचे जैविक दोष, आजाराबद्दल माहिती मिळावी.

- **अपराध व शिक्षा –** डॉक्टरांनी स्त्री–पुरुष दोघांची चाचणी करून गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर गर्भलिंग परीक्षा करणे गुन्हा आहे. या परीक्षेत अल्ट्रासोनोग्राफी, रक्त चाचणी व इतर कोणतीही चाचणी करून गर्भाचे लिंग ओळखून ते सांगणे गुन्हा आहे. जर असे घडल्यास पहिल्या वेळच्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावास व दहा हजार रुपये दंड व नंतर असा अपराध उघडकीस आला तर प्रत्येक वेळी ५ वर्षे कारावास व पन्नास हजार रुपये दंड डॉक्टरांना होईल.
- ही चाचणी करून घ्या असा प्रचार करणाऱ्याला तीन वर्षे कैद व दहा हजारांपर्यंत दंड होईल.
- गर्भलिंग चाचणी करण्यासाठी दवाखाना, केंद्र किंवा प्रयोगशाळेची मदत घेणारी व मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात घडवून आणणाऱ्या व्यक्तीस ३ वर्षे कैद व पन्नास हजार रुपये दंड होऊ शकतो.
- गर्भचाचणी करण्यासाठी तंत्रज्ञान व तंत्र विकणे वा विकत घेणे कायद्याने गुन्हा आहे.
- गर्भलिंग चाचणी करणारा डॉक्टर असेल व त्याच्यावर गुन्हा सिद्ध झाला तर पहिल्या गुन्ह्यासाठी त्यांची वैद्यकीय नोंदणी पाच वर्षाकरिता व दुसऱ्या वेळेस कायमची रद्द होईल.

- एखाद्या स्त्रीला जबरदस्तीने मुलीचा गर्भ आहे की मुलांचा हे ओळखण्यासाठी चाचणी करण्यासाठी भाग पाडील तर ती व्यक्ती गुन्हेगार ठरेल. स्त्री नाही.
- या कायद्याच्या उल्लंघनासाठी जर विशिष्ट शिक्षा नमूद नसेल तर या गुन्ह्यासाठी तीन महिन्यांपर्यंत कैद व एक हजार रुपयांपर्यंत दंड होईलच पण गुन्हा उघड झाल्यावरही गुन्हेगार गुन्हा करतच असेल तर प्रत्येक दिवसाला पाचशे रुपयांपर्यंत अतिरिक्त दंड आकारला जाईल.
- या कायद्यांतर्गत सर्व गुन्हे दखलपात्र व आजामीनपात्र आहेत.
- या गुन्ह्याची तक्रार स्वत: पीडित व्यक्ती वा तिच्या नातेवाईकांनी केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने नियुक्ती केलेल्या समितीकडे लेखी स्वरूपात करावी. एखाद्या सामाजिक संस्थेने अशा प्रकारची तक्रार समितीकडे केली असेल व त्या समितीने १५ दिवसांत योग्य कार्यवाही केली नसल्यास संस्था प्रथमवर्ग दंडधिकारी न्यायालयात गुन्ह्याची तक्रार करू शकते.

## विशिष्ट परिस्थितीत गर्भपात आवश्यक असेल तर

- गर्भवतीचे वय ३५ पेक्षा जास्त व तिच्या जिवाला धोका असेल.
- दोनपेक्षा जास्त वेळा गर्भपात झाला असेल.
- गर्भवती महिलेस रासायनिक, भौतिक व इतर कारणांमुळे बाधित झाली असेल....
- गर्भवती महिलेस, तिच्या पतीस किंवा त्यांच्या कुटुंबातील इतरांना जनुकीय गुणसूत्र आजार असल्यास.

## इतर महत्त्वाच्या बाबी

- अशी चाचणी फक्त गर्भवती महिलेच्या परवानगीनेच होईल. तिला तिचा पती वा इतर नातेवाईक जबरदस्ती करू शकत नाहीत.
- गर्भचाचणी करणारा तज्ज्ञ व्यक्ती गर्भवती व तिच्या नातेवाईकांना गर्भाच्या लिंगाबाबत भाषा, चिन्ह, खुणांच्या मदतीने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष माहिती देऊ शकत नाही. तो गुन्हा आहे.

- चाचणीसंबंधी सर्व माहिती सोप्या भाषेत वैद्यकीय तज्ज्ञ गर्भवतीला देऊन, त्याच्या (चाचणीच्या) परिणामांबद्दल ही सांगेल. तिला सर्व पटल्यावर तिची लेखी नमुना पत्रावर सही घेईल. हे बंधनकारक आहे.
- गर्भलिंग चाचणी गर्भवतीने आपल्या संमतीने केली आहे हे सिद्ध होईपर्यंत न्यायालय तिचा पती वा नातेवाईकांनी जबरदस्ती केली आहे असे गृहीत धरेल.
- २००२ नंतर गर्भचाचणी तंत्रज्ञान, जनुकीय जैविक दवाखाने, प्रयोगशाळा उघडण्यास सरकारकडे अधिकृत नोंदणी करणे आवश्यक आहे.
- दवाखाने, जैविक केंद्र व प्रयोगशाळांना सर्व प्रकारच्या गर्भचाचण्यांची माहिती रजिस्टरमध्ये नोंदविणे तसे मागच्या दोन वर्षांच्या सर्व नोंदी ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

● शासनाचा मदत दूरध्वनी क्रमांक १८००–२३३–४४७५ ची मदत घेता येते किंवा समुचित प्राधिकारी यांच्याकडे तक्रार नोंदविता येते. सोनोग्राफी करणारे डॉक्टर तसेच गरोदर मातेने सोनोग्राफी करण्यासाठी जबरदस्ती करणाऱ्या व्यक्ती या दोघांनाही कडक शिक्षा होऊ शकते.

**www.aamchimulgi.com यावर तक्रार नोंदविता येते.**

## शासनाच्या महिलांविषयक इतर योजना

- बालिका समृध्दी योजना
- शालेय पोषण आहार योजना
- मुलींकरिता सायकल वाटप योजना
- महिला समुपदेशन योजना
- मागासवर्गीय मुलींकरिता अनुदानित वसतिगृह योजना
- अहिल्याबाई होळकर मुलींना मोफत प्रवास योजना
- परित्यक्ता, विधवा व निराधार महिलांना शिधापत्रिका वाटप योजना
- इंदिरा गांधी मातृत्व अनुदान योजना
- पाळणाघर योजना
- बाल संगोपन योजना
- मुलींकरिता विशेष निरीक्षण गृह
- महिला अल्पनिवास गृह योजना

# लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२



## पोक्सो - POCSO

**वैशिष्ट्ये :**

१) संपूर्ण कायदा व कार्यपद्धती बालकेंद्रित आहे.

२) लिंगनिरपेक्ष कायदा

३) समतीचे वय १६ ऐवजी १८ वर्षे

४) गुन्ह्याची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक.

५) गुन्हा झाला नाही असे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे.

**कलम २ :-** बालकाचा अर्थ १८ वर्षांखालील कोणतीही व्यक्ती असा आहे.

**कलम ३ :-** लिंगप्रवेशाचा अत्याचार (कलम ४ शिक्षा १० वर्ष, आजीवन कारावास)

**कलम ५ :-** गंभीर स्वरूपाचा लिंगप्रवेशाचा अत्याचार (कलम ६ शिक्षा २० वर्षे)

**कलम ७ :-** लैंगिक आघात (कलम ८ शिक्षा ३ ते ५ वर्षे)

**कलम ९ :-** गंभीर प्रकारचा लैंगिक आघात (कलम१० शिक्षा ५ ते ७ वर्षे)

**कलम ११ :-** लैंगिक छळ (कलम १२ शिक्षा ३ वर्षांपर्यंत, दंड)

**कलम १३ व १४ :-** अश्लील साहित्य निर्मितीसाठी बालकाचा वापर (कलम १५ शिक्षा ३ वर्षांपर्यंत)

**कलम १६ व १७ :-** गुन्हा करण्यास उत्तेजन देणे/मदत करणे.

**कलम १८ :-** गुन्हा करण्याचा प्रयत्न करणे.



**कलम १९-२० :-** गुन्ह्याची नोंद करणे बंधनकारक

**कलम २३ :-** माध्यमासाठी गोपनीयतेचे नियम

**कलम २८ ते ३८ :-** विशेष न्यायालयाची तरतूद व बालकेंद्रित कार्यपद्धती

# बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६




**कलम ९ – बालकाशी विवाह करणाऱ्या प्रौढ पुरुषास शिक्षा** – जी कोणी, १८ वर्षावरील प्रौढ पुरुष असणारी व्यक्ती बालकाशी विवाह करेल ती व्यक्ती २ वर्षे सक्षम कारावास किंवा १ लाख रू. पर्यंत द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षेस पात्र होईल.

**कलम १० :– बालविवाह विधीपूर्वक लावण्याबाबत शिक्षा** – जी कोणी, व्यक्ती स्वतःस माहिती असून देखील बालविवाह विधीपूर्वक लावेल ती व्यक्ती २ वर्षांपर्यंत सक्षम कारावास व १ लाख रू. पर्यंत द्रव्यदंड अशा शिक्षेस पात्र होईल.

**कलम ११ :–** जी कोणी व्यक्ती बालविवाह विधीपूर्वक करण्यास प्रोत्साहन देईल किंवा परवानगी देईल ती व्यक्ती, २ वर्ष सश्रम कारावास व १ लाख रु. द्रव्यदंड या शिक्षेस पात्र असेल. परंतु यामध्ये कोणतीही महिला कारावासाचे शिक्षेस पात्र असणार नाही.






बंद कीजिये बालविवाह,
चुनिये मत अपराध की राह।

# माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८



## Cyber Crime

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. प्रत्येक कार्य तंत्रज्ञानाशिवाय होणे अशक्यप्राय झाले आहे. प्रत्येक क्षेत्रात आधुनिकीकरण झाले आहे. इंटरनेटचा वापर आज घराघरात होतांना दिसतो. प्रत्येकाच्या हातात मोबाईल सारखे यत्रं असून इंटरनेटचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे इंटरनेटचेदेखील उपयोग व दुरुपयोग होऊ लागले आहेत. सोशल मीडियाच्या वापराने दैनंदिन संपर्क जलदगतीने होत आहे. मात्र सोशल मीडिया वापरतांना अनेक बाबींची काळजी घ्यावी लागते. कारण सायबर गुन्ह्यांचे प्रमाण देखील वाढले आहे. माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ मधील पुढील काही कलम महिलांना माहिती असणे आवश्यक आहे.

## महिलांविरूध्द होणारे सायबर गुन्हे

- **ई हरासमेंट** :– बदनामी करण्यासाठी मोबाईल एस.एम.एस., सोशल साईट किंवा इंटरनेटच्या माध्यमातून मजकूर प्रसिध्द केला जातो. यातून महिला अथवा तरुणींच्या आप्तजनांची दिशाभूल करून बदनामी केली जाते.
- **फिशिंग** :– तुम्हाला लॉटरी लागली आहे. तुमचा मोबाईल अमक्या योजनेसाठी निवडलेला आहे. त्यासाठी आधी पैसे भरा, तुमची निवड या पदासाठी झाली आहे. असे आमिष दाखवून पैसे भरण्यास सांगितले जाते.
- **सायबर स्टॉकिंग (पाठलाग)** :– यामध्ये महिलांच्या दिवसभराचे दिनचर्ये वर लक्ष ठेवून ई–मेल, एस.एम.एस. च्या माध्यमातून त्यांची बदनामी केली जाते. त्यांना अश्लील एस.एम.एस. पाठविले जातात.
- **सायबर पोर्नोग्राफी** :– यात तुमच्या फोटोची मोडतोड करणे, अश्लील छायाचित्रांची क्लीप तयार करणे, अश्लील चित्राचे चेहऱ्यावर अन्य महिलेचा चेहरा बदलून सोशल साईटचे माध्यमातून बदनामी करणे.

- **डिफेमेशन (बदनामी)** :– ई मेल / मोबाईल, एस.एम.एस. च्या माध्यमातून बदनामी करणे.
- **ई–मेल स्फुफिंग** :– मॅसेजच्या माध्यमाने दोघांमध्ये वितुष्ट निर्माण करणे असा हा प्रकार आहे. यामध्ये आपल्या नावाने आपल्या प्रियजनांच्या मोबाईलवर अथवा ई–मेलवर पाठविलेल्या मॅसेजची मोडतोड करून दिशाभूल करणे. या प्रकाराने समोरच्या व्यक्तीला हा मॅसेज आपणच पाठविलेला असल्याचा भास होतो.
- **मॉर्फिंग ऑफ क्रिमिनल** :– याप्रकारामध्ये अश्लील प्रोफाईल तयार करून त्रास देण्यात येतो. यामध्ये वैयक्तिक छायाचित्र बदनामी करण्यासाठी सोशल साईटवर टाकण्यात येतात.

## सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी

- सोशल साईटवर स्वतःचे फोटो, वैयक्तिक माहिती, दूरध्वनी क्रमांक अपलोड करून नयेत.
- पहिल्यांदाच आलेला आक्षेपार्ह एस.एम.एस. अथवा कॉमेंटकडे दुर्लक्ष करू नये. त्याचा अर्थ समजून घेऊन त्याची वेळीच दखल घ्यावी. याबाबत संबंधित सोशल नेटवर्किंग साईट अथवा पोलिसांशी संपर्क साधावा.
- आपल्या योग्य मित्रांनाच फ्रेंडलिस्टमध्ये ठेवावे.
- अनोळखी व्यक्तींनी पाठविलेल्या फ्रेंड रिक्वेस्टमध्ये आपला कोणी म्युच अल फ्रेंड असल्यास त्या व्यक्तीकडे सदर व्यक्तीची आधी खातरजमा करून घ्यावी.
- आपल्या फ्रेंडलिस्टमधील इतर मित्र मैत्रिणींनाही अनोळखींच्या रिक्वेस्ट बाबत सतर्क करावे.
- आपली फसवणूक होत असल्यास, तात्काळ पोलिसांशी संपर्क साधणे गरजेचे आहे.
- कुठलाही सोशल App डाऊनलोड करण्याआधी किंवा सोशल मीडियावर सभासद होण्याआधी Terms and Conditions अवश्य वाचावे. आपण वापरत असलेली माहिती सदरच्या Apps  ला किती वापरू देणार आहात हे आपल्याला समजेल.

- ऑनलाईन मैत्री करताना, चॅटिंग करताना समोरच्या व्यक्तीचा प्रोफाईल तपासून घ्या. बनावट प्रोफाईल बनवून ऑनलाइन मैत्री करून फसवणुकीचे प्रकार उघडकीस आले आहेत.
- पासवर्डबद्दल विशेष काळजी घ्या. आपला पासवर्ड कोणाशीही शेअर करू नका, पासवर्ड ठराविक काळाने बदलणे अतिउत्तम. तो कठीण असू द्या.
- ऑनलाईन मैत्री झालेल्या मित्रांना एकांतात भेटणे टाळावे.
- सोशल नेटवर्किंग साईटवर आवश्यक तेवढीच माहिती टाका.
- फोटो अपलोड करतांना कमीत कमी Resolution चा टाका. (किमान 72 dpi)
- सोशल नेटवर्किंग साइट्वर प्रायव्हसी सेटिंग्ज पर्याय उपलब्ध असतात, त्यांची बारकाईने माहिती घ्या, त्यांचा वापर करा.

## पालकांनी घ्यावयाची काळजी

इंटरनेटची मोहिणी सर्व वयोगटाला भुरळ घालत आहे. आपले पाल्य जर नेट चा वापर करत असेल तर पालकांनी स्वत: जागरूक होणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या मुलांशी संवाद साधून नेटवर्किंग बाबत त्याच्यासोबत चर्चा करा. १२ वर्षाखालील मुले नेट वापरत असतील तर स्वत: लक्ष ठेवा. मोबाईल देणे कटाक्षाने टाळावे. मुलांना नेट, सोशल मिडीया वापरावयाचे नियम, वेळेचे नियोजन तयार करून ते पाळले जातील याची काळजी पालकांनी घेणे आवश्यक आहे.

## सायबर क्राईम



माहिती तंत्रज्ञान (सुधारित) कायदा दिनांक २७/१०/२००९ पासून भारतात लागू झाला आहे. ११ प्रकारच्या गुन्ह्यांसाठी कलम ६५ ते ७८ मध्ये गुन्हे व त्याबाबत शिक्षा कलमे सांगितली आहेत.

**कलम ६६ (इ) :** जो कोणी जाणीवपूर्वक

किंवा हेतुपूर्वक व्यक्तीच्या प्रायव्हेट एरियाची प्रतिमा साठवून ठेवेल किंवा प्रसिध्द करेल त्यास ३ वर्षे कैद व २ लाख रू.पर्यंत दंड अशी शिक्षा होईल.

**कलम ६७ :** जो कोणी अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिध्द करेल त्यास प्रथम गुन्ह्यांस ५ वर्षे कैद व १ लाख रू.पर्यंत दंड व त्यानंतरच्या गुन्ह्यांस १० वर्षे कैद व २ लाख रू.पर्यंत दंड अशी शिक्षा होईल.

**मोबाइल चित्रफीत तयार करणे व ती इतरांकडे पाठविणे :** महिलेची, मुलीची मोबाईल अश्लील चित्रफीत केली जाते यामागे उद्देश हा वाईटच असतो.

**कलम ६७ (अ) :** जो कोणी लैंगिक शोषणाबाबतचे साहित्य प्रसिध्द करेल किंवा प्रसारित करेल किंवा त्यासाठी कारणीभूत होईल त्यास ५ वर्षे कैद व १० लाख रू.पर्यंत दंड व त्यानंतरच्या गुन्ह्यास ७ वर्षे कैद व १० लाख रू. पर्यंत दंड अशी शिक्षा होईल.

**कलम ६७ (ब) :** जो कोणी,

(अ) – लहान मुलांच्या लैंगिक शोषणाबाबतचे साहित्य प्रसारित करेल किंवा त्यासाठी कारणीभूत होईल.

(ब) – लहान मुलांसंदर्भातील अश्लील साहित्य जो कोणी लिखित वा प्रतिमेच्या स्वरूपात तयार करेल, गोळा करेल, नेटवर बघेल, डाऊनलोड करेल, जाहिरात करेल किंवा वाटेल.

(क) – लहान मुलांच्या लैंगिक शोषणासाठी किंवा त्यास्वरूपाचे संबंध वाढविण्यासाठी इंटरनेटवर लहान मुलांशी संपर्क करील.

(ड) – लहान मुलांच्या शोषणासाठी ऑनलाईन सुविधा पुरवील.

(इ) – लहान मुलांच्या लैंगिक शोषणाबाबत इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रेकॉर्डिंग करेल.

त्यास ५ वर्षे कैद व १० लाख रू.पर्यंत दंड व त्यानंतरच्या गुन्ह्यास ७ वर्षे कैद व १० लाख रू.पर्यंत दंड अशी शिक्षा होईल.

**कलम ७८ :** अपराधाचे अन्वेषण करण्याचे अधिकार.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ यामध्ये काही अंतर्भूत असले तरी पोलीस निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाचे अन्वेषण करू शकेल.

# अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६




मानव तस्करी ही आजच्या युगाची सर्वात मोठी भयावह समस्या आहे. आदिम युगात ही समस्या नव्हती पण आजच्या प्रगत समाजाला लागलेला हा मोठा कलंक आहे. भारतात या मानवतेला कलंक लावणाऱ्या गुन्ह्याने उग्र रूप धारण केले आहे. कायदाही याचे निवारण करण्यास तोकडा पडत आहे.

संपूर्ण जगात ड्रग्ज आणि अमली पदार्थांचा व्यापार शस्त्रास्त्रांचा व्यापार व मानवी तस्करी उग्र रूप धारण करत आहे. या व्यवहारात अब्जावधी रुपयांची उलाढाल होत असते.

मानव तस्करीत स्त्रिया व मुले यांचा गैरवापर प्रामुख्याने होतो. याला रोखण्यासाठी अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ चा कायदा भारत सरकारने केला आहे. यात कायद्यात २५ हून अधिक कलमे आहेत. त्यातील काही महत्त्वाच्या कलमांचा विचार येथे करण्यात आला आहे.

**कलम ३ –** वेश्या व्यवसायासाठी कुंटणखाना चालविणे अथवा चालविणाऱ्यास मदत करणे. यासाठी शिक्षा १ वर्षापेक्षा कमी नसेल परंतु ३ वर्षापेक्षा अधिक नसेल एवढा सश्रम कारावास व २०००/– रू. पर्यंत दंड व



अपराधाच्या पुनरावृत्तीस २ वर्षापेक्षा कमी नसेल परंतु ५ वर्षापेक्षा अधिक नसेल एवढा सश्रम कारावास व २०००/– रू.पर्यंत दंड.

**कलम ४ –** वेश्या व्यवसायापासून कमाई करणे अथवा उपजीविका करणे. यासाठी शिक्षा २ वर्षांपर्यंत

कारावास किंवा १०००/– रू. पर्यंत दंड किंवा दोन्ही जेव्हा अशी कमाई बालकाच्या किंवा अज्ञान व्यक्तीच्या वेश्या व्यवसायाशी संबंधी असेल तेव्हा ७ ते १० वर्षांपर्यंत कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल.



**कलम ५ –** वेश्याव्यवसायासाठी मुलगी अथवा स्त्रीस पळविणे किंवा तयार करणे. यासाठी शिक्षा ३ ते ७ वर्षांपर्यंत सश्रम कारावास व २०००/– रू. पर्यंत द्रव्यदंड या कुकर्माखाली कोणताही अपराध कोणत्याही व्यक्तीच्या इच्छेविरूध्द केला असल्यास ती बालक असल्यास ७ वर्षापर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा, ती अज्ञान असल्यास ७ ते १४ वर्षापर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा.

**कलम ६ –** नुसार वेश्या व्यवसाय सुरू असलेल्या जागी महिला, बालिका, बालक यांना डांबून ठेवले त्यांच्याजवळील चीजवस्तू काढून घेतल्यास ७ ते १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते.

**कलम ७ –** सार्वजनिक ठिकाणी वेश्या व्यवसाय चालविणे. यासाठी शिक्षा पहिल्या सिध्द अपराधासाठी ३ महिन्यांपर्यंत कारावास किंवा २००/– रू. दंड किंवा दोन्ही. दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधसिध्दीबद्दल ६ महिन्यापर्यंत कारावास तसेच २००/– रू. पर्यंत दंड

**कलम ८ –** नुसार दारात, खिडकीत, गॅलरीत उभे राहून खाणा–खुणा, अश्लील शब्द यांनी इशारे करून वेश्या व्यवसायाचा प्रचार व प्रसार केल्यास तसेच आकृष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्यास १ वर्षांचा कारावास व ५०० रू. दंड होऊ शकतो.

**कलम ९ –** नुसार वेश्या व्यवसायासाठी व्यक्तीचा वापर त्याचा ताबा असणारी व्यक्ती अथवा यंत्रणेस परत मानवी व्यापार करायला लावल्यास ७ ते १० वर्षांचा कारावास होऊ शकतो.

# कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ



(प्रतिबंध, मनाई व न्याय निवारण) कायदा २०१३ (विशाखा गाईड लाईन्स)

वरील कायदा ९ डिसेंबरपासून लागू झाला आहे.

**व्याख्या :– लैंगिक छळात खालील बाबींचा समावेश होतो.**

नकोसा शारीरिक संपर्क व लगट, लैंगिक वर्तणुकीची मागणी किंवा विनंती, लैंगिक शेरेबाजी, पोर्नोग्राफी दाखविणे, शारीरिक किंवा शाब्दिक किंवा अन्यप्रमाणे नको असलेले लैंगिक वर्तन करणे.

**कलम–३ (२)** नुसार कामाचे ठिकाण म्हणजे शासकीय, निमशासकीय, अशासकीय किंवा खासगी नियंत्रणाखाली असलेले कोणतेही कार्यालय, संघटन, संस्था, डिपार्टमेंट, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, हॉस्पिटल, नर्सिंग होम, क्रीडा संस्था, स्टेडियम, कामाच्या ठिकाणी पोहचविणारी वाहने, असंघटित क्षेत्र, निवासाचे ठिकाण अथवा घर. यात महिलेला रोजगारात प्राधान्य देण्याचे उघड वा छुपे वचन, कामात अडथळे, रोजगाराला धोका, भयप्रद, अपमानास्पद वागणूक या सर्व बाबी लैंगिक छळात समाविष्ट आहेत.

**तक्रार कोणाला करता येते?**

१) कामाच्या ठिकाणी, निवासाच्या ठिकाणी कार्यरत असणारी स्त्री मग ती कोणत्याही वयाची असो तक्रार करू शकते. ही स्त्री




शारीरिक अथवा मानसिकरीत्या सक्षम नसल्यास तिचे सहकर्मी, नातेवाईक, मैत्रीण ही तक्रार देऊ शकते.



२) तक्रार लेखी असावी.

३) तक्रार घटना घडल्यापासून तीन महिन्यांच्या आत करणे अनिवार्य आहे.

४) तक्रार दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सहा प्रतीत दाखल करावी लागतात.

५) तक्रार अंतर्गत तक्रार समिती अथवा स्थानिक तक्रार समिती समोर करण्यात यावी.

६) अशी समिती गठन न करणाऱ्या मालकाला ५०,००० रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाऊ शकतो. (कलम २६ प्रमाणे)

७) सहापेक्षा कमी कर्मचारी असलेल्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांकडे स्थानिक समिती स्थापन करावी. सदर समितीसमोर मालकाच्या विरूद्ध तक्रार करता येते.

८) प्रत्येक विभाग, तालुका, वॉर्ड अथवा नगरपालिकेसाठी नोडल आधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. आलेली तक्रार सात दिवसांच्या आत नोडल अधिकाऱ्याने समितीकडे वर्ग करावी.

९) तक्रारदार महिलेने विनंती केल्यास तडजोडीने प्रश्न सोडविण्याची एक संधी देण्यात यावी.

१०) तक्रार सत्य आहे असे जाणवल्यास ७ दिवसांच्या आत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवावा. चौकशीचा अहवाल शिफारशीसहित मालकासमोर जिल्हाधिकाऱ्यापुढे ६ दिवसांच्या आत सादर करावा.

११) समिती खालीलप्रमाणे शिक्षेचा शिफारस करू शकते – नोकरीवरून काढून टाकणे, पगारवाढ रोखणे, बढती रोखणे, लेखी माफीनामा लिहून घेणे, वॉर्निंग देणे, कौन्सिलिंग करणे, समाजसेवा करायला भाग पाडणे.


# स्त्री देहाचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक कायदे



**कलम ३ –** अश्लील जाहिरातीच्या प्रदर्शनास बंदी, शिक्षा (कलम ६)

**कलम ४ –** स्त्रियांचा मनोभंग होईल अशा समाजाच्या नीतिमत्तेस नुकसान होईल अशा अश्लील जाहिराती प्रसिद्ध करणे, भाड्याने देणे, विकणे, अश्लील पुस्तके, लिखाण छापणे, विक्री करणे, शिक्षा (कलम ६)

# हुंडाबंदी प्रतिबंधक अधिनियम १९६१




हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ या अधिनियमातील कलम २ अन्वये हुंडा या शब्दाची व्याख्या विवाहातील एका पक्षाने विवाहातील अन्य पक्षास किंवा विवाहातील कोणत्याही पक्षाच्या आई–वडिलांना अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीने विवाहातील कोणत्याही पक्षास किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस, उक्त पक्षाच्या विवाहाच्या वेळी किंवा तत्पूर्वी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिलेली किंवा द्यावयाचे कबूल केलेली कोणतीही संपत्ती अथवा मौल्यवान रोख असा आहे. परंतु त्यामध्ये ज्या व्यक्तींना मुस्लिम व्यक्तिगत कायदा (शरिअत) लागू आहे त्या व्यक्तींच्या बाबतीत दहेज किंवा मेहर यांचा समावेश होत नाही.

### कायदेशीर तरतूद

### हुंडा देण्याबद्दल किंवा घेण्याबद्दल शिक्षा

हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१ च्या कलम ३ अन्वये हुंडा देण्याबद्दल किंवा घेण्याबद्दल कमीत कमी ५ वर्षे इतक्या मुदतीची कारावासाची आणि

कमीत कती रुपये १५०००/- अथवा अशा हुंड्याच्या मूल्याइतकी रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल इतक्या रकमेची दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे.

### हुंडा मागण्याबद्दल शिक्षा

कलम ४ अन्वये कोणत्याही व्यक्तीने हुंडा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे मागितल्यास त्यास कमीत कमी ६ महिने परंतु २ वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची आणि रु १००००/- पर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे.

### जाहिरात बंदी

हुंडा प्रतिबंधक कायदा, कलम ४ अ अन्वये कोणत्याही व्यक्तीने हुंड्या संदर्भात जाहिरात छापल्यास किंवा प्रसिद्ध केल्यास कमीत कमी ६ महिने परंतु ५ वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा रुपये १५०००/- पर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे.

### भारतीय दंडविधान संहितेमधील हुंड्यासंदर्भातील महिलांवर होणारा अत्याचाराबाबत कायदेशीर तरतुदी

१) भा द वि ४९८(अ) एखाद्या स्त्रीच्या पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी तिला हुंड्यासाठी क्रूर छळाची वागणूक देणे. तिला पैशांची किंवा मौल्यवान वस्तूंची मागणी करून मानसिक व शारीरिक त्रास देऊन तिच्या जीविताला धोका निर्माण होईल अशी वागणूक देणे.

### भा द वि कलम ३०४ (ब) हुंडाबळी

विवाह झाल्यापासून ७ वर्षांच्या आत एखाद्या स्त्रीचा मृत्यू भाजून अथवा अगर मरणास कारण शारीरिक जखमांमुळे घडला आहे आणि असे दाखविण्यात आले आहे की तिचा मृत्यू हा तिला तिच्या नवऱ्याकडून तसेच त्याच्या नातेवाईकांकडून हुंड्याची मागणी पूर्ण करावी यासाठी तिचा मानसिक, शारीरिक छळ केल्याने झाला असेल तेंव्हा अशा मृत्यूस हुंडाबळी असे म्हणावे, जो कोणी हुंडाबळी घडवेल त्याला ७ वर्षे शिक्षा किंवा आजन्मकारावास असू शकेल.

●●●

# कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५




भारतीय संविधान कलम १४ अन्वये महिलांना भेदभावापासून मुक्ती कलम १५ अन्वये स्त्री-पुरुष समानता आणि २१ अन्वये जीविताचे व स्वातंत्र्याचे संरक्षण व्हावे. हा व्यापक हेतू डोळ्यांसमोर ठेवून महिलांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये. समाजामध्ये कौटुंबिक हिंसाचार घडू नये. म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ व नियम २००६ संपूर्ण भारतात **'२६ ऑक्टोबर २००६'** पासून लागू केला आहे.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ च्या अंतर्गत न्यायदंडाधिकारी हे पीडित महिलेस त्रास देणारे पती किंवा इतर नातेवाईक या एकत्र राहणारा पुरुष साथीदार अथवा त्याचे नातेवाईक यांच्याकडून शारीरिक, लैंगिक, आर्थिक, तोंडी किंवा भावनिक अत्याचाराने पीडित महिलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षिततेसाठी इतर आदेश काढून ज्याद्वारे संवैधानिक अधिकार सुरक्षित करू शकतात.

शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य नसल्यामुळे तिला हिणवणे किंवा धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडित व्यक्तीचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे व वरील सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे म्हणजेच महिलेचे स्वत:चे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे, घराबाहेर काढणे.


## वरील कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येतील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे



- मारहाण करणे.
- तोंडात मारणे.
- तडाखा देणे.
- चावणे.
- लाथ मारणे.
- गुद्दे मारणे.
- ढकलणे.
- लोटणे (जोराचा धक्का मारणे)
- इतर कोणत्याही पद्धतीने शारीरिक दुखापत किंवा वेदना देणे.

## मानसिक अत्याचार :

- अपमान करणे.
- नावाने बोलावणे.
- चारित्र्याबद्दल किंवा वागणुकीबद्दल संशय घेणे.
- मुलगा झाला नाही म्हणून अपमान करणे.
- हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे.
- तुम्हाला किंवा तुमच्या ताब्यात असलेल्या मुलाला शाळेत, महाविद्यालयात किंवा इतर शैक्षणिक संस्थात जाण्यास मज्जाव करणे.
- नोकरी स्वीकारण्यास मज्जाव करणे.
- तुम्हाला किंवा तुमच्या ताब्यात असलेल्या मुलाला घरामधून बाहेर जाण्यास सांगणे.



- नेहमीच्या कामासाठी कोणत्याही व्यक्तींबरोबर भेटण्यास मज्ञाव करणे.
- तुम्हास विवाह करावयाचा नसल्यास, विवाह करण्यास जबरदस्ती करणे.
- तुमच्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्यास मज्ञाव करणे.
- त्याच्या/त्यांच्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्यास जबरदस्ती करणे.
- आत्महत्येची धमकी देणे.
- इतर कोणतेही भावनात्मक किंवा तोंडी अपशब्द वापरणे.

## आर्थिक अत्याचार

- हुंड्याची मागणी करणे
- तुमच्या किंवा तुमच्या मुलांच्या पालन–पोषणासाठी पैसे न देणे.
- तुम्हाला किंवा तुमच्या मुलांना अन्न–वस्त्र, औषधे इत्यादी न पुरविणे.
- तुम्हाला नोकरी करण्यास मज्ञाव करणे.
- नोकरीवर जाण्यासाठी अडथळा उत्पन्न करणे.
- नोकरी स्वीकारण्यास संमती न देणे.
- तुमचा पगार, रोजगार वापरण्यास परवानगी न देणे.
- पगारातून, रोजगारातून आलेले पैसे काढून घेणे.
- तुम्ही राहत असलेल्या घरातून तिला हाकलून देणे.
- घराचा कोणताही भाग वापरण्यास किंवा घरात जाण्यास अडथळा निर्माण करणे.
- घरातील नेहमीचे कपडे, वस्तू वापरण्यापासून रोखणे.
- भाड्याच्या घराचे भाडे न देणे.



## या कायद्याद्वारे महिलांना मिळणाऱ्या सुविधा

- तुमच्या किंवा तुमच्या मुलांवर होणारे कौटुंबिक अत्याचार तुम्ही थांबवू शकता.
- प्रतिवादीकडून तुमचे स्त्रीधन, दानदागिने, कपडे इत्यादींचा ताबा तुम्ही मिळवू शकता.
- न्यायालयाच्या संमतीने बँकेचे एकत्र खाते किंवा लॉकर प्रतिवादीने वापरण्यास प्रतिबंध करू शकता.
- तुम्ही प्रतिवादीबरोबर ज्या घरात राहत होता त्या घरात राहू शकता.
- प्रतिवादी घरामध्ये अशांतता, ढवळाढवळ किंवा घराचे स्वास्थ्य बिघडवत असेल तर त्यास प्रतिबंध करू शकता.
- प्रतिवादी तुम्ही राहत असलेले घर विकत असेल तर त्यास प्रतिबंध करू शकता.
- प्रतिवाद्याकडून राहत्या घराचे भाडे मिळवू शकता किंवा त्यांच्याकडून इतर कोणतीही पर्यायी व्यवस्था आवश्यक सुविधांसह मिळवू शकता.
- प्रतिवाद्याला घर/मालमत्ता ज्यामध्ये तुम्ही राहता त्यावर कर्ज काढता येऊ शकत नाही किंवा गहाण टाकता येऊ शकत नाही. प्रतिवादी या मालमत्तेवर इतर कोणताही बोजा निर्माण करू शकत नाही. त्यासाठी तुम्ही प्रतिबंध करू शकता.
- प्रतिवादीला हिंसाचार करण्यापासून, आपल्या नोकरीच्या जागी जाण्यापासून तसेच त्याला कोणत्या प्रकारचा संपर्क करण्यापासून आणि आपल्या मुलांना अथवा आपल्या इतर नातेवाईकांना देखील त्रास देण्यापासून प्रतिबंध करू शकता.
- प्रतिवादी तुमच्या मनाविरुद्ध फोनवर बोलत असेल किंवा पत्राद्वारे, ई–मेलद्वारे कोणत्याही प्रकारे संबंध ठेवत असेल तर तुम्ही त्यास मज्जाव करू शकता.
- प्रतिवादीस तुमच्या मुलांच्या शाळेपासून लांब राहणे किंवा तुमची मुले भेटत असतील, अशा जागी जाण्यास मज्जाव करू शकता.



- प्रतिवादीस पिस्तूल, इतर कोणतेही शस्त्र किंवा धोकादायक वस्तू बाळगण्यास मज्जाव करू शकता.
- प्रतिवाद्याकडून तुमच्यासाठी आणि तुमच्या मुलांच्या उपजीविकेसाठी खर्च मागू शकता.
- प्रतिवाद्याकडून होणाऱ्या शारीरिक दुखापतीच्या वैद्यकीय उपचारांसाठी, खर्चांसाठी नुकसान भरपाई मागू शकता.
- प्रविवाद्याकडून होणाऱ्या मानसिक यातना व भावनिक कष्ट यासाठी नुकसान भरपाई मागू शकता.
- चरितार्थ गमवावा लागल्याबद्दल नुकसान भरपाई मागू शकता.
- प्रतिवादीने तुमच्या ताब्यातील किंवा अधिकारातील मालमत्ता काढून घेणे, नुकसान करणे, हानी करणे याबाबत मज्जाव करू शकता.
- मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र, सेवा पुरविणाऱ्या संस्था, वैद्यकीय सुविधा, निवासगृह इत्यादींमधून आवश्यक त्या सेवा सुविधा प्राप्त करून घेऊ शकता.
- भारतीय दंड विधान ४९८ (अ) कलमाखाली पोलिसांत तक्रार दाखल करू शकता.
- पीडित महिला प्रतिवाद्याकडून भारतीय दंडसंहितेच्या कलम १२५ अंतर्गत मिळणाऱ्या पोटगीव्यतिरिक्त १ अतिरिक्त पोटगी स्वत:साठी तसेच मुलांसाठी मागू शकता.
- तक्रार केल्याची प्रत, अर्ज केल्याची प्रत, वैद्यकीय अहवाल किंवा इतर वैद्यकीय तपासण्या तुम्ही किंवा तुमच्या मुलांनी केलेल्या असतील तर त्याच्या प्रती तुम्ही प्राप्त करू शकता.

# मनोधैर्य योजना : ३० डिसेंबर २०१७

सुधारित 'मनोधैर्य योजना' ३० डिसेंबर २०१७ ला महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार कार्यान्वित करण्यात आली.

या नवीन 'मनोधैर्य योजने'नुसार पीडितेस अर्थसाहाय्य मंजूर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे राहील.

१) घटनेच्या संदर्भातील FIR ची प्रत व अन्य कागदपत्रे संबंधित पोलीस तपासणी अधिकारी, ई-मेल अथवा अन्य माध्यमातून १ तासाच्या आत संबंधीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण तसेच संबंधित जिल्हा महिला विकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येतील.

२) त्यानंतर संबंधीत पिडित महिलेस वैद्यकीय व मानसिक आधार देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या ट्रॉमा टीममार्फत त्यांना तात्काळ सेवा पुरविण्यात येईल.

३) राज्य शासनामार्फत दरवर्षी यासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांना निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

४) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत उघडण्यात आलेल्या.

५) यथास्थिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा राज्य विधी सेवा प्राधिकरण १०० दिवसांच्या आत उर्वरित अर्थ साहाय्याची रक्कम संबंधीत पीडितेस मंजूर करेल.

६) पीडितेस मंजूर करण्यात आलेल्या एकूण रकमेपैकी सुरवातीस तातडीची मदत म्हणून मंजूर करण्यात आलेली रू.३० हजार इतकी रक्कम वजा करून उर्वरित २५ टक्के रक्कम पीडितेस अथवा पिडितेच्या नातेवाईकांस रोखीने देण्यात येईल. त्यानंतर उर्वरित ७५ टक्के रक्कम पीडितेच्या नावे

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येईल. व याबाबतच्या पावतीची प्रत सात दिवसांच्या आत संबंधीत पीडितेस मंजूर करावयाच्या अर्थसाहाय्याच्या

## पीडित महिलांसाठी 'मनोधैर्य' योजना



- **ॲसिड हल्ला, सामूहिक बलात्कार प्रकरणातील महिलांना देणार आर्थिक साहाय्य**
- **वैद्यकीय उपचार, न्यायालयीन खर्च आणि पुनर्वसनासाठी देणार मदत**

रक्कमेसाठी तिला स्वतःच्या नावे KYC Norms असलेले बँक खाते उडण्यात आले पाहिजे. पीडित व्यक्ती अज्ञान असेल तर त्याच्या पालकाच्या नावे बँक खाते उघडण्यात यावे. या नवीन 'मनोधैर्य योजने'नुसार पीडितेस द्यावयाच्या अर्थसहाय्याव्यतिरिक्त पीडिताच्या पुनर्वसनासाठी पीडितेस खालील प्रकारच्या सेवा संबंधीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्यामार्फत पुरविण्यात याव्यात.

१) या योजनेच्या अंतर्गत पीडित महिला / बालकास सवर शासकीय निमशासकीय, नगरपालिका, महानगरपालिका, खाजगी रुग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येईल.

२) या दुर्दैवी घटनांमध्ये पीडित महिला / बालक HIV / AIDS बाधित झाले असतील तर त्यांना आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा उपरोक्त शासकीय, निमशासकीय रूग्णालयात मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतील.

३) याशिवाय सदर पीडित महिलेस वैद्यकीय व मानसिक आधार देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या प्रशिक्षित ट्रॉमा टीममार्फत त्यांना समुपदेशन / कायदेशीर इत्यादी सेवा विनामूल्य पुरविण्यात येतील. तथापि सुधारित नवीन 'मनोधैर्य योजने'च्या अंतर्गत खालील गुन्ह्यांमधील पीडित महिला / बालकांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

१) बलात्कार – Section 375 and 376, 376 (2), 376 (A),376 (B), 376 (C), 376 (D), 376 (E), of the Indian Penal Code (IPC)

२) बालकांवरील लैंगिक अत्याचार Section 3,4,5 and 6 or Protection of Children From Sexual Offences (POCSO) act 2013.

३) ॲसिड हल्ला Section 326 A and 326 B of Indian Penal Code (IPC)

४) अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम 1956 [immoral Trafffic (Prevention) Act1956 (PITA)] च्या अनुसार पोलीस धाडीत अटक करण्यात आलेल्या बलात्कार / लैंगिक अत्याचार / ॲसिड हल्ल्याच्या गुन्ह्यातील घटनांमधील १८ वर्षांखालील वयोगटातील पीडित अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. १८ वर्षावरील अटक झालेल्या महिलांच्या पुनर्वसनासाठी 'उज्ज्वला योजना' केंद्र पुरस्कृत कार्यान्वित आहे.

या नवीन 'मनोधैर्य योजने'च्या अंतर्गत पीडितांच्या अर्थसहाय्याच्या मागणीचे अर्ज स्वीकारण्यापासून ते अर्थसाहाय्य मंजुरीचे पूर्ण अधिकार हे संबंधीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य विधी सेवा प्राधिकरण यांचे राहतील. ही एक Single Window System असेल.

५) या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्यामर्फत किंवा यथास्थित राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत किंवा यथास्थित राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत Manodhaairya Assistance Account (MAA) नावाने स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येईल.

६) तसेच अशा पीडित महिलेस नोकरी / व्यावसायिक प्रशिक्षण देऊन तिचे पुनर्वसन करण्यासाठी वरील योजना आहे.

•••

# महिला व बाल विकास आयुक्तालय
# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

**पार्श्वभूमी:-** स्त्रियांना समाजात सन्मानाने वावरता यावे यासाठी भारतीय राज्यघटनेत विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदींनुसार राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर १९९३ मध्ये भारताच्या संविधानाने अनुच्छेद १४,१५, १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी राज्याच्या महिला धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विशेषत: संविधानाच्या अनुच्छेद ३८,३९,३९-अ व ४२ करिता महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

**आयोगाची रचना -**१९९३ च्या महाराष्ट्र विधायक क्र दत, १९९३ प्रमाणे दिनांक २५ जानेवारी १९९३ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना झाली. आयोगामध्ये अध्यक्ष, सहा अशासकीय सदस्य, एक सचिव (सदस्य), एक पदसिद्ध सदस्य म्हणून पोलीस महासंचालकाचे प्रतिनिधी असेल. आयोगाची अधिकारी कर्मचारी संख्या एकून ३९ इतकी आहे.

**आयोगाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:-**

- ✅ स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे.
- ✅ स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारात्मक उपाययोजना करणे.
- ✅ स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्यांचे परिणामकारकरीत्या संनियंत्रण व अंमलबाजावणी करणे.
- ✅ स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे व उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देणे.

**आयोगाचे अधिकार:-** आयोग एक वैधानिक व स्वयंशासित संस्था आहे. आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त असून या अधिनियमान्वये तपास करण्याच्या प्रयोजनासाठी शासनाच्या सहमतीने राज्याच्या किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या सेवांचा वापर करील. कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास फर्मावू शकेल. दस्ताऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावू शकेल. कार्यालयातून सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवू शकेल.

## कायदे तज्ज्ञ समिती

हुंडाबळी, बलात्कार, कुटुंब न्यायालयातील खटल्यांतील प्रकरणांवर सदर समिती सल्ला देते ही समिती महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या विविध कायद्यांतील तरतुदींचे परीक्षण करते आणि त्यात सोईस्कर बदलही सुचविते. स्त्रियांचे हक्क सुरक्षित राहण्यासाठी नवीन कायदे सुचविण्याचे कामही ही समिती करते.

## गरजू महिलांनी संपर्क कोठे साधावा?

महिलांसाठी असलेल्या संरक्षणात्मक कायद्याचा भंग झाल्यास, त्यांच्यावर अत्याचार झाल्यास अशा अन्यायपीडित महिला राज्य महिला आयोगाकडे दाद मागू शकतात.

### राज्य महिला आयोगाचा पत्ता

**अध्यक्ष**

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, महाराष्ट्र शासन**

गृह निर्माण भवन ब्रांदा (पूर्व) म्हाडा बिल्डिंग,
पोटमाळा कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२-२६५९०७३९,२६५९१७६८,२६५९०४७४
वेबसाईट -www.mahilaayog.com

# परिवार कल्याण समिती



सर्वोच्च न्यायालयाच्या क्रिमिनल अपिलेट ज्युरिडिक्शन अंतर्गत कलम ४९८ अ च्या गैरवापराबद्दल ॲमिकस क्युरी नियुक्त करून त्यांच्या सखोल निरीक्षणानुसार खालील निर्देश दिले आहेत.

अ) जिल्हा स्तरावर कुटुंब कल्याण समिती स्थापन करण्यात याव्यात ज्यात प्रामुख्याने तीन सदस्य राहतील. त्यांची नियुक्ती जिल्हा कायदेविषयक सल्लागार समिती जिचे जिल्हा न्यायाधिश किंवा सेशन जज अध्यक्ष आहेत. त्यांनी करावयाची आहे व नियुक्त समितीला सोपविलेल्या कामाचा अहवाल पडताळणी तसेच अवलोकन करतील.

ब) समितीचे सदस्य जनतेतील समाज सेवक, प्रतिष्ठित नागरिक सरकारी सेवेतील अधिकारी, निवृत्त अधिकारी व्यक्ती, कायद्याचे जाणकार यातून करण्यात यावी.

क) सदस्यांना कामाबाबत साक्षीदार म्हणून बोलावण्यात येणार नाही.

ड) ४९८ अ खाली प्राप्त झालेली तक्रार, सक्षम पोलीस अधिकारी किंवा न्यायाधीश, स्थापिक समितीकडे अग्रेषित करतील त्या तक्रारीची शहानिशा ही समिती, तक्रारीतील दोन्ही पक्षांशी संपर्क साधून करील. ज्यासाठी टेलीफोन वा तत्सम माध्यमाचा वापर करून आपले निरीक्षण नोंद करील.

इ) अहवाल अथवा रिपोर्ट संबंधित अधिकारी वा मा. न्यायाधीश यांना सादर करतील ज्यात समितीच्या सदस्यांचे सत्यशोधन नोंदणी असेल.

फ) सदर समितीचा अहवाल संक्षिप्त मात्र वस्तुस्थिती निदर्शक असेल.

ग) सदर समितीचा रिपोर्ट येईपर्यंत कोणासही अटक करण्यात येऊ नये.

# महिला सामाजिक सुरक्षा समिती

## महिला सुरक्षेच्या दृष्टीने मूलभूत योजनांचा आढावा घेण्याकरिता समिती गठीत करणे १२ मे २०१५

महिलांवर रस्त्यांवरील होणारे अत्याचार थांबविण्यासाठी व महिला सुरक्षेच्या दृष्टीने काही मूलभूत उपाययोजना करण्यासाठी व त्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यासाठी शासनाने एक समिती गठीत करण्याबाबत निर्णय १२ मे २०१५ रोजी घेतला आहे. यात महिलांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने सार्वजनिक सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी प्रत्येक पोलीस आयुक्तालय व जिल्हा पोलीस मुख्यालयामध्ये खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात आली.

| क्र. | पोलीस आयुक्तालय क्षेत्रामध्ये | पद | जिल्ह्यामध्ये | पद |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त | अध्यक्ष | पोलीस अधीक्षक | अध्यक्ष |
| २ | महागरपालिका आयुक्त | सदस्य | नगर परिषदेचे कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३ | महाराष्ट्र राज्य महावितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता (मुंबईसाठी संबंधीत वीज पुरवठा कंपन्यांचे समकक्ष अधिकारी) | सदस्य | महाराष्ट्र राज्य महावितरण सदस्य मंडळाचे अधीक्षक अभियंता | सदस्य |
| ४ | सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता | सदस्य | सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता | सदस्य |

*वरीलप्रमाणे जी समिती गठण करण्यात येईल ती खालीलप्रमाणे कार्य करील.*

१) पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, निर्जन खासगी स्थळी सुरक्षा रक्षक ठेवणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, इत्यादीबाबत आढावा घेतील.

२) महिलांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने सार्वजनिक स्थळांच्या सुरक्षिततेबाबत त्रुटी आढळल्यास या त्रुटींचे निराकरण करण्याची शिफारस समिती संबंधीत प्राधिकरणास करेल. अशा त्रुटींचे निराकरण झाल्याची खात्री समिती करून घेईल.

## विशेष तपास पथक (१२ ऑक्टोबर २०१७)

महिलांचा विनयभंग, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार इत्यादी अनेक प्रकारच्या महिलांवरील अत्याचारांच्या घटनांचा सखोल व परिपूर्ण आणि तातडीने तपास करून आरोपी विरूध्द तात्काळ खटले दाखल करण्याची कार्यवाही करण्यासाठी विशेष तपास पथके गठित करण्यात आले आहेत.

महिलांवरील अत्याचार, गुन्हे तपास पथकाची रचना खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | पदनाम | संख्या |
|---|---|---|
| १ | पोलीस उपअधीक्षक (आर्थिक गुन्हे) | १ |
| २ | पोलीस निरीक्षक / सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक | ४ |
| ३ | पोलीस हवालदार | २ |
| ४ | पोलीस नाईक | २ |
| ५ | पोलीस शिपाई | ८ |

**या तपास पथकाचे कार्य पुढीलप्रमाणे असेल**

- महिला व बालकांवरील गुन्ह्यांच्या सद्यस्थितीच्या संदर्भात आढावा घेऊन वेळेवर दोषारोपपत्र पाठविण्यासंबंधी पाठपुरावा करणे.
- अपराध सिध्दता वाढविण्यासाठी उपाययोजना करणे
- केंद्र व राज्य शासनाने महिलांवरील अत्याचार / गुन्हे या संदर्भात पारित केलेल्या अधिनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यवाही करणे.
- महिलांवरील अत्याचारांबद्दल दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचा तपास त्वरील करण्याच्या दृष्टिकोणातून संबंधीतांना प्रशिक्षण देणे.
- महिलांच्या संरक्षणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.
- महिलांच्या संरक्षणासंदर्भात जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने कार्यशाळा, चर्चासत्र व विशेष मोहीम राबविणे.

- महिलांच्या संरक्षणासंदर्भात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधून त्यांना सहकार्य व मार्गदर्शन करणे.



- महिलांवरील अत्याचार, गुन्हे / घटनांसंदर्भात पोलीस महासंचालक यांनी घटक प्रमुखांना दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने अंमलबजावणी करून घेणे आणि आढावा अहवाल पोलीस महासंचालक यांना सादर करावा.
- घटक प्रमुख विनिर्दिष्ट करतील अशा महिलांवरील अत्याचारांबाबत दाखल होणाऱ्या गंभीर गुन्ह्यांचा तपास करणे.



## मी एक स्त्री आहे

**याचा मला सार्थ अभिमान आहे**
**पुरूष माझा सहकारी आहे**
**आम्ही दोघेही समान आहोत**
**हे जग ना त्याचे एकट्याचे**
**ना हे जग माझ्या एकटीचे**
**हे जग आम्हा दोघांचे आहे**
**ते सुंदर आणि सुखी ठेवून**
**पुढच्या पिढीच्या हाती**
**आम्हाला द्यायचे आहे.**

# महिला साहाय्य कक्षात राबविण्यात येणारे उपक्रम



१) महिला अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये पीडित महिलेला आवश्यक ती मदत करण्याचा प्रयत्न केला जातो. पीडित महिलेला समुपदेशनाद्वारे सक्षम बनविण्याबरोबर तिच्यामध्ये कायदेविषयक जनजागृती निर्माण केली जाते. महिला अत्याचारांच्या प्रकरणी कडक कायदेशीर कारवाई करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले जातात.

२) गावात जेथे जेथे महिलांविषयक गंभीर गुन्हे घडतात त्यांचा तातडीने पाठपुरावा करण्यात येतो.

३) महिला साहाय्य कक्षात येणाऱ्या गंभीर प्रकरणांमध्ये गरज भासल्यास घटनास्थळी भेट देऊन (Spot Visit) पीडित महिलेला मानसिक व भावनिक आधार देण्याचा प्रयत्न केला जातो.

४) माननीय पोलीस अधीक्षकांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली महिलांच्या पोटगी संबंधित समन्स व वॉरंट यांची कडक अंमलबजावणी करण्यात येते. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना तसेच त्यांच्या मुलांना ताबडतोब पोटगी मिळण्यास मदत होते. न्यायालयाकडून अत्याचार पीडित महिलेस न्याय दिला जातो.

५) जिल्ह्यात Monthly Crime Meeting मध्ये महिला साहाय्य कक्षातील अधिकाऱ्यांकडून महिला अत्याचारांच्या गुन्ह्यांवर विशेष लक्ष दिले जाते.

६) पोलीस कर्मचाऱ्यांसाठी असणाऱ्या सेवाअंतर्गत प्रशिक्षणामध्ये महिला अत्याचार या विषयावर प्रशिक्षण दिले जाते.

७) जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने दरवर्षी विविध उपक्रम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने घेण्यात येतात. ज्यामध्ये प्रामुख्याने महिला पोलिसांचे पथ संचलन, पोलीस ठाणे पातळीवर महिला कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या देणे, मान्यवरांची व्याख्याने, महिलांच्या कार्यशाळा, विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या महिलांचे सत्कार इ. अनेकविध कार्यक्रम हाती घेतले जातात.

८) बुलडाणा जिल्ह्यासाठी महिला व मुलींसाठी टोल फ्री क्रमांक **१०९१** तसेच

हेल्पलाईन नंबर **८६९८०००११**, कंट्रोल रूम बुलडाणा – **०७२६२ – २४२४००** हा दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करण्यात आलेला आहे. त्यामुळे अत्याचारग्रस्त पीडित महिलेस पोलिसांशी तात्काळ साधता येतो. पोलिसांकडून आवश्यक ती कायदेशीर मदत अत्याचार ग्रस्त महिलेस देण्यात येते. त्या क्षेत्रात एखाद्या महिलेवर अत्याचार घडला असेल त्या क्षेत्रातील पोलीस ठाण्यात आणि नियंत्रण कक्षात तात्काळ माहिती देऊन संबंधित महिलेस आवश्यक ती मदत दिली जाते.

९) बहुतांश महिला वर्गाला कायदेविषयक बाबींचे ज्ञान नसते. त्यामुळे त्यांच्यावर होणारा अन्याय सहन करीतच ती जगत असते. जनतेला महिलाविषयक कायद्यांचे ज्ञान व्हावे आणि गुन्हा केल्यानंतर शिक्षेची काय तरतूद असते याची जाणीव व्हावी. म्हणून यात्रेत महिला साहाय्य कक्षातर्फे स्त्रियांना कायद्याचे ज्ञान व्हावे म्हणून पोस्टर्सचे प्रदर्शन भरविण्याची योजना काही ठिकाणी राबविण्यात आली. या प्रदर्शनामध्ये महिलांविषयक कायदे व त्यातील शिक्षेबद्दलची माहिती, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री–भ्रूणहत्या, व्यसन मुक्ती, तंटामुक्ती इत्यादी अनेक विषयांवरची पोस्टर्स जनजागृतीसाठी लावली जातात. महिला साहाय्य कक्षाचे कर्मचारी प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांच्या शंकांचे निरसन करतात.

१०) बुलडाणा जिल्ह्यात महिला, मुले, ज्येष्ठ नागरिक यांना मदत करण्यासाठी **८६९८०००११** ही 'हेल्पलाईन' सुरू करण्यात आली आहे.

११) स्त्रीवर अत्याचार झाला तर तिला जिल्ह्याच्या ठिकाणी येणे प्रत्येक वेळेस शक्य नसते. त्यासाठी तालुका स्तरावर पोलीस ठाण्यात समुपदेशन केंद्रही स्थापन करण्याची सरकारी योजना आहे. बुलडाणा जिल्ह्यात बुलडाणा, खामगाव व मेहकर इ. ठिकाणी तालुका स्तरावरील समुपदेशन केंद्र आहेत.

१२) हुंडा प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक अत्याचार कायदा २००५ इत्यादी अनेक बाबतीत जनजागृती करण्यासाठी शहरात व जिल्ह्याच्या महत्त्वाच्या ठिकाणी जनतेला दिसतील अशा ठिकाणी पोस्टर्स लावण्यात येतात. तसेच महिला साहाय्य कक्षातही असे पोस्टर्स लावण्यात येतात, याचा निश्चितच उपयोग होतो.

# महिला छेडछाड विरोधी (दामिनी) पथक

ग्रामीण भागातील मुली शिक्षणासाठी पुढे येत आहेत, हि अत्यंत चांगली बाब आहे. मात्र ग्रामीण शिक्षणासाठी काही ठिकाणी राहत्या घरांपासून दूर जावे लागते. अशावेळेस मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. शाळा महाविद्यालयात जाणे-येणे करण्यासाठी बस, ऑटोरिक्षा, जीप अशा वाहनांचा वापर होत असतो. अशा वेळेस मुलींना छेडछाड प्रकारांना सामोरे जावे लागते. त्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनला महिला छेडछाड विरोधी पथक स्थापन केले असून अशा शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या महिलांनाच नव्हे तर गर्दीच्या ठिकाणी वावरणाऱ्या महिलांना सुद्धा याचा लाभ होत आहे.





बुलडाणा जिल्ह्यातील महिला व मुलींसाठी हेल्पलाईन नंबर **१०९१** तसेच **८६९८०००११** कंट्रोल रूम बुलडाणा - **०७२६२ - २४२४००** हा दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करण्यात आलेला आहे. या क्रमांकावर आपली तक्रार मांडू शकतात.

# महिला सुरक्षा विशेष कक्ष
## (महिला तक्रार निवारण केंद्र)

पोलीस अधीक्षक पातळीवरील सामाजिक सुरक्षा समिती महिलांच्या प्रश्नांसाठी कार्यरत असते.

१) अध्यक्ष : पोलीस अधीक्षक

२) उपाध्यक्ष : पोलीस उप अधिक्षक

३) सचिव : प्रभारी महिला तक्रार निवारण कक्ष.

४) सभासद : महिला सामाजिक कार्यकर्त्या.

५) पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक (स्था.गु.शा.)

याचप्रमाणे तालुका पातळीवरील पोलीस निरीक्षक यांच्या अधिपत्याखालील सामाजिक सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. एक महिला पोलीस हवालदार व दोन महिला कार्यकर्त्यांचा समावेश आहे. तसेच पोलीस ठाण्यामध्ये महिला दक्षता समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे.

१) प्रमुख : पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी

२) सदस्य : दहा महिला कार्यकर्त्या

या कार्यकर्त्या क्रियाशील जनतेच्या विश्वासास पात्र असलेल्या आणि राजकारणाशी संबंधित नसून केवळ महिलांच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या असाव्यात असे शासनाला अभिप्रेत आहे.

## तक्रार अर्ज आल्यानंतर कामकाजाची पध्दत

### १) अर्जदार महिलेस माहिती देणे –

सर्व प्रथम महिला साहाय्य कक्षात येणाऱ्या पीडित महिलांच्या तक्रारी तोंडी स्वरूपात ऐकून घेतल्या जातात. अर्ज कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले जाते.

### २) अर्ज नोंदणी –

अर्ज नोंदणी करताना महिला अर्जदारांचे अर्ज थेट स्वीकारले जातात. अर्जदार व गैरअजरदारांचे मोबाईल नंबर, सविस्तर पत्ता लिहून घेतला जातो.

### ३) गैर अर्जदारांना तडजोडीसाठी बोलावणे –

अर्जदार महिलेने ज्या–ज्या गैरअर्जदारांची नावे दिली आहेत त्यांना कक्षात हजर राहण्याची समज देण्यात येते.

### ४) गैर अर्जदारांचे जबाब नोंदविणे –

महिला साहाय्य कक्षातील कर्मचारी गैरअर्जदार हजर होताच अर्जाच्या अनुषंगाने त्याचे जबाब लेखी स्वरूपात नोंदवितात.

### ५) अर्जदार–गैरअर्जदारांच्या एकत्रित बैठका –

जबाब नोंदविल्यानंतर अर्जदार व गैरअर्जदारांना एकत्रित बोलावले जाते. तसेच नातेवाईकांनाही बोलावले जाते. बऱ्याच वेळेस एकाच बैठकीत दोघांचेही गैरसमज पूर्ण न झाल्यास तीन किंवा जास्त वेळेस बैठका घेतल्या जातात.

### ६) महिला साहाय्य कक्ष समितीच्या बैठकीस बोलाविणे –

अर्जदार व गैरअर्जदारांना दर शनिवारी होणाऱ्या बैठकीत बोलावले जाते. महिला सहाय्य कक्ष समितीमध्ये डॉक्टर, वकील, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते इत्यादी मंडळी असतात. त्यांच्या समोर संबंधितांना हजर करून समुपदेशन केले जाते.

### तडजोड

अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील गैरसजम मिटविण्यासाठी महिला साहाय्य कक्षातील कर्मचारी, समिती सदस्य यांच्यामार्फत समुपदेशन केले जाते. दोन्ही पक्षांच्या स्वखुशी व सहमतीने अर्जदार महिलेस नांदण्यास पाठविण्यात येते. ठराविक दिवसांनंतर पुन्हा पडताळणीसाठी त्यांना महिला साहाय्य कक्षात बोलावण्यात येते. त्यांचा संसार व्यवस्थित चालू असल्याची खातरजमा करून पडताळणी रजिस्टर वर दोघांच्याही स्वाक्षऱ्या घेण्यात येतात व पुढील तारीख देण्यात येते.

### प्रकरण फाईल करणे

बऱ्याचदा मेसेज करूनही अर्जदार, गैरअर्जदार महिला साहाय्य कक्षात हजर होत नाहीत व काही वेळेस त्यांच्यातील वाद आपसांत, नातेवाईकांच्या मदतीने मिटवून घेतात. अशा परिस्थितीत सदर अर्ज समिती आणि वरिष्ठांमार्फत फाईल करण्यात येते.



# भरोसा सेल
## (महिला सहाय्य कक्ष)

बुलडाणा पोलीस घटकात ८ मार्च २०२० रोजी भरोसा सेल स्थापन करण्यात आले.

**प्रस्तावना :**

भरोसा सेलमध्ये पिडीत महिलांना सर्व प्रकारचे सहाय्य एकाच ठिकाणी मिळवून देण्याकरीता पोलीस, वैद्यकीय सेवा, मानसोपचार तज्ञ, विधीतज्ञ, संरक्षण अधिकारी व पुनर्वसन या सेवा उपलब्ध आहेत. भरोसा सेल हे पिडीत महिलांच्या तक्रारी स्विकारण्याकरीता २४ – ७ सुरू असून महिला हेल्पलाईन क्रमांक १०९१ व ११२ या क्रमांकावर तक्रारदारांच्या तक्रारी स्विकारून संबंधित तज्ञांकडे पाठविण्यात येतात.

**गरज आणि उद्दिष्टे :**

संकटात सापडलेल्या महिलांच्या करीता पोलीस, वैद्यकीय सेवा, मानसोपचार तज्ञ, विधीतज्ञ, संरक्षण अधिकारी व पुनर्वसन या सेवांच्या माध्यमातून तात्काळ सहाय्य / आधार देऊन त्यांच्या समस्या योग्य पध्दतीने सोडविण्यास मदत करणे. कोणत्याही प्रकारच्या हिंसाचारास बयी पडलेल्या महिलांना अत्याचाराविरूध्द लढण्यास मानसिक बळ देणे.

**जनतेसाठी योजनेची उपयोगिता :**

आजच्या धकाधकीच्या जीवनामुळे तसेच बदलत्या जीवनशैलीमुळे कौटुंबिक कलह / कौटुंबिक समस्यांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे अनेकांचे वैवाहिक आयुष्य संपुष्टात येताना दिसत असून अशा अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. याचा विपरीत परिणाम विवाहित दांपत्याच्या वैयक्तिक जीवनासोबतच त्यांच्या पाल्यांवर सुध्दा होतो. दिवसेंदिवस ही समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे. तसेच कुटुंब व्यवस्था मोडकळीस येत आहे. कौटुंबिक वादाच्या तक्रारींमध्ये पोलीस विभाग व त्यांचेशी संलग्न समुपदेशन केंद्र यांचे मार्फत वेळीच योग्य मार्गदर्शन, प्रभावी समुपदेशन, मानसिक आधार मिळाल्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या, वेळीच सोडवल्या जात आहेत.

## सेवा व सुविधा

- पोलीस मदत
- हेल्पलाईन
- समुपदेशन
- वैद्यकीय सेवा
- विधी विषयक सेवा
- मानसोपचार तज्ञ
- पिडीताचे पुनर्वसन
- प्रचलित कायद्यान्वये पिडीतांचे संरक्षण
- लहान मुलांसाठी खेळण्याची व्यवस्था

## पदनिहाय वर्गवारी :

| अ.क्र. | पद | दर्जा |
|---|---|---|
| १. | प्रभारी अधिकारी | महिला पोलीस निरीक्षक / मसपोनि |
| २. | समन्वय अधिकारी | महिला पोलीस उपनिरीक्षक / मसपोनि |
| ३. | स्वागत अधिकारी | पोशि / मपोशि |
| ४. | कार्यालयीन कामकाज | पोहवा |
| ५. | संगणक चालक | पोशि / मपोशि |
| ६. | मदतनिस | मपोशि |
| ७. | हेल्पलाईन | पोशि/मपोशि |
| ८. | वाहन चालक | पोशि / मपोशि |
| ९. | समुपदेशक | समुपदेशक |
| १०. | कायदेशीर सल्लागार | वकील |
| ११. | मानसोपचार तज्ञ | डॉक्टर |
| १२. | विवाहपुर्व समुपदेशन | डॉक्टर |
| १३. | स्त्रीरोग तज्ञ | डॉक्टर |
| १४. | लैंगिक विकार तज्ञ | डॉक्टर |
| १५. | बाल मानसोपचार तज्ञ | डॉक्टर |

## भरोसा सेल येथील कार्यपध्दती :

पिडीत महिलांच्या सर्व समस्यांचे एकाच ठिकाणी निराकरण व्हावे याकरीता भरोसा सेलची कार्यपध्दती खालीलप्रमाणे असावी.

- **स्वागत कक्ष :** भरोसा सेल येथे पिडीत तक्रारदार प्रथम स्वागत कक्ष येथे आल्यानंतर त्या व्यक्तीकडे आस्थेने चौकशी व विचारपूस करून

त्यांचे येण्याबाबत प्रयोजन व समस्या विचारून त्याची नोंद स्वागत कक्ष रजिस्टरमध्ये घेतली जाते. त्यानंतर पिडीत व्यक्तीला त्यांचे तक्रारीबाबत अधिकारी सविस्तर चौकशी करतात व अर्जदारांचे आवश्यकतेनुसार समुपदेशन सेवा देण्याकरीता केस क्रमांक देवून अर्जदारांची संगणकावर फाईल तयार केली जाते.

- **संगणकावर फाईल तयार करणे :** अर्जदाराची फाईल तयार करताना अर्जदाराकडे प्राथमिक आवश्यक माहिती विचारून त्यानुसार संगणकावर विहित नमुन्यामध्ये फाईल बनविली जाते. सदर फाईलमध्ये अर्जदार व अर्जदाराचे आई, वडील, मुले यांचेबाबत नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, व्यवसाय इत्यादी सविस्तर माहिती नोंद केली जाते. तसेच गैरअर्जदार व त्यांचे आई, वडील, मुले यांचेबाबत नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, व्यवसाय इत्यादी सविस्तर माहिती नोंद केली जाते. त्यानंतर तक्रारदारास समुपदेशक यांचेकडे समुपदेशनासाठी पाठविण्यात येते.

- **आवश्यकतेनुसार सेवा उपलब्ध करून देणे :** फाईल बनविल्यानंतर तक्रारदारास समुपदेशन करण्याकरीता केस फाईल समुपदेशक यांचेकडे पाठवून समुदेशकांकडून समुपदेशन केले जाते.

- **समुपदेशक :** समुपदेशक तक्रारदाराकडे सविस्तर चौकशी करून त्याबाबत सर्व माहिती तक्रारदाराच्या केस फाईलमध्ये नोंद करतात व समुपदेशन करतात. त्यानंतर आवश्यकतेनुसार समुपदेशनाकरीता अर्जदार व गैरअर्जदार यांना सुचनापत्र देवून व फोनद्वारे संपर्क साधून बोलाविण्यात येते. तसेच त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार यांचे समुपदेशन होवून समझोता झाल्यास त्यानंतर देखील फॉलोअप करीता त्यांना भरोसा सेल येथे बोलाविण्यात येते. व त्यानंतर केस बंद करण्यात येते, तसेच त्यानंतर देखील फोनद्वारे संपर्क साधून सातत्याने फॉलोअप घेतला जातो. फॉलोअप मध्ये अर्जदार यांनी पुन्हा तक्रार असल्याचे सांगितल्यास त्यांना भरोसा सेल येथे बोलवून अर्जदार व गैरअर्जदार यांचे समुपदेशन केले जाते.

- **मानसोपचार तज्ञ सेवा :** समुपदेशनादरम्यान अर्जदार किंवा गैरअर्जदार अथवा दोघांनाही मानसोपचार तज्ञ सेवा देणे आवश्यक आहे असे वाटल्यास त्यांना मानसोपचार तज्ञ यांचेकडून सेवा दिली जाते.

- **संरक्षण अधिकारी यांची सेवा :** काही अर्जदार किंवा गैरअर्जदार यांचा समझोता न झाल्यास काही अर्जदारांच्या गरजेनुसार त्यांना कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार मा. न्यायालयात केस दाखल करण्याकरीता महिला व बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी यांची सेवा दिली जाते. संरक्षण अर्जदाराची केस मा. न्यायालयात विनामूल्य दाखल करून सरकारी वकील उपलब्ध करून दिले जातात.

- **विधी अधिकारी :** काही अर्जदारांना गैरअर्जदार पती सोबत राहायचे नसल्यास त्यांचे इच्छेनुसार मा. न्यायालयात केस दाखल करण्यासाठी त्यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचेकडून विधी अधिकारी मार्फत विधी सेवा देवून त्यांचेकडून कोर्ट केस करीता मोफत वकील उपलब्ध करून दिले जातात.

- **वैद्यकीय अधिकारी :** भरोसा सेल येथे आलेल्या पिडीत महिलेस वैद्यकीय उपचार करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना तात्काळ महानगरपालिका रुग्णालयात पाठवून उपचार करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

- **व्यसनमुक्ती स्वयंसेवक अधिकारी :** भरोसा सेल येथे नोंद असलेल्या केसेसच्या समुपदेशनादरम्यान अर्जदार किंवा गैरअर्जदार यांना व्यसन असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना व्यसनमुक्ती स्वयंसेवक यांचेकडून सेवा दिली जाते.



- **निवारा :** भरोसा सेल येथे मदत घेण्याकरीता आलेल्या पिडीत महिलेस राहण्याची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यास त्यांना महिला व बाल कल्याण विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहामध्ये तात्पुरत्या स्वरूपात राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.



''परिशिष्ट १''

# महिला सहाय्य कक्षासाठी मार्गदर्शक तत्त्वे

| | |
|---|---|
| प्रभारी अधिकारी | पोलीस निरीक्षक हे आधार केंद्रात प्रबंधक म्हणून काम पाहतील व आधार केंद्रातील प्रत्येक प्रकरणावर देखरेख ठेवतात व पिडीतास न्याय मिळण्याकरीता योग्य निर्णय घेवून जबाबदारी स्विकारतील.<br>प्रभारी अधिकारी हे इतर विभाग जसे (पो.ठाणे, हॉस्पिटल, कायदे विषयक मदत, समुपदेशक) आधार केंद्रातील प्रकरणाचे नोंदणीवर देखरेख ठेवतील. समन्वय अधिकारी हे तयार करण्यात आलेला मासिक अहवाल वेळोवेळी वरिष्ठांना सादर करतील.<br>आधार केंद्रातील प्रकरणी कामाचा आढावा घेतील.<br>समुपदेशक हे अर्जदार, गैरअर्जदार यांना समुपदेशन करून शेवटी ते प्रभारी अधिकारी यांचे समोर आणून योग्य ते समुपदेशन करून अर्जदाराच्या समस्येचे निराकरण करतात. |
| समन्वय अधिकारी | सहा. पोलीस निरीक्षक किंवा पोलीस उप निरीक्षक हे समन्वय अधिकारी म्हणून काम पाहतील.<br>समन्वय अधिकारी हे आधार केंद्रास सेवा उपलब्ध करून देणाऱ्या संस्था जसे कायदेविषयक, वैद्यकीय, मानसोपचार व सामाजिक सल्लागार सेवा यांची अद्ययावत यादी वेळोवेळी तयार करतात व पिडीत महिलानच्या संपर्कात राहून त्यांना मार्गदर्शन करतील.<br>आधार केंद्रातील (कर्मचाऱ्यांचे कामासह) सोई, इमारतीची क्षमता, काळजी वाहक यांना मार्गदर्शन ही सर्व कामे करतील. |
| स्वागत कक्ष | भरोसा सेल, महिला सहाय्य कक्ष, गुन्हे शाखा, एक खिडकीद्वारे (अर्ज शाखा), दरबार, वरिष्ठांकडून, ई–मेलद्वारे, राष्ट्रीय महिला आयोग, राज्य महिला आयोग, पोस्टाद्वारे तक्रारी अर्ज प्राप्त होतात. सदर अर्ज प्राप्त झाल्यावर अर्ज रजिस्टरी नोंद करून केस नंबर तयार करून त्याची फाईल तयार करतील. आधार केंद्रातील स्वागत अधिकारी येणाऱ्या प्रकरणांची नोंदणी झाल्यानंतर दुःखी व पिडीत महिलेस समुपदेशनाकरीता मार्गदर्शन करतील.<br>स्वागत अधिकारी आलेल्या प्रकरणाच्या नोंदणी प्रक्रिया पुर्ण करून पिडीतांची कायदेविषयक सल्लागार, वैद्यकीय अधिकारी, समुपदेशक, पो. अधिकारी, अथवा मानसोपचार तज्ञ यांचेशी भेट निश्चित करतील.<br>पिडीत महिला आधार केंद्रात आल्यास तिचे म्हणणे ऐकून घेवून तिला योग्य ते मार्गदर्शन करतील. |

| | |
|---|---|
| कार्यालयीन कामकाज | आधार केंद्रात दोन पोलीस हवालदार दर्जाचे अंमलदार हे प्रामुख्याने सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार, गैरअर्जदार यांना फोनद्वारे, सम जपत्रद्वारे तसेच ई–मेलद्वारे समुपदेशनकामी हजर राहणेबाबत कळविले जाईल व सातत्याने त्यांचे समुपदेशन केले जाईल.<br>समुपदेशनामध्ये अर्जदार, गैरअर्जदार यांचेत समझोता झाल्यास त्यांचे जबाब घेवून अर्ज बंद केला जाईल. समस्यांचे निराकरण न झाल्यास अर्जदार यांना पोलीस स्टेशन / कोर्ट / संरक्षण अधिकारी यांचेकडे अर्जदार यांच्या इच्छेनुसार जाण्याचा सल्ला देतील. |
| संगणक चालक | आधार केंद्रातील संगणक चालक हे नोंदणी झालेल्या केस संबंधीची सविस्तर माहिती दररोज संगणकावर भरतील व बॅकअप घेवून ते अद्यावत करून ठेवतील.<br>दैनंदिन कामकाज करतील. (डेली रिपोर्ट, अर्ज मंथली वगैरे) |
| मदतनिस | प्रभारी अधिकारी यांनी नेमून दिलेली इतर कामे करतील.<br>महिला अत्याचाराबाबत माहिती प्राप्त करून ती वरिष्ठांना सादर करतील.<br>अर्जदार यांना पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करायचे असल्यास त्या अर्जाचे पुढे काय झाले? याबाबत पाठपुरावा करतील.<br>काही अर्जदार यांचे गैरअर्जदार यांना वारंवार फोन करून देखील समुपदेशनला येत नाहीत असे अर्ज पोलीस स्टेशनला चौकशीसाठी पाठवतील व त्यांचा १० दिवसांनी पाठपुरावा करतील. |
| समुपदेशक | आधार केंद्रात आलेल्या पिडीत महिलेस मानसिक आधार देतील.<br>समुपदेशक हे प्रकरणाची गंभीरता समजून तसेच कागदपत्रे आणि पुर्व इतिहास या सर्व गोष्टी विचारात घेवून पिडीत महिलेस व तिच्या परिवारास इतिहास या सर्व गोष्टी विचारात घेवून पिडीत महिलेस व तिच्या परिवारास प्रथम समुपदेशन करतील. तसेच आवश्यकतेनुसार मध्यस्थी करून निपक्षपाती निर्णय घेतील.<br>अर्जदार, गैरअर्जदार यांचे आवश्यकतेनुसार समुपदेशन केले जाईल. शक्यतो समुपदेशन हे ४ वेळा केले जाईल. त्यानंतर त्यांचे जबाब घेतले जातील. समुपदेशनामध्ये अर्जदार, गैरअर्जदार यांचेत समझोता झाल्यास त्यांचे जबाब घेवून अर्ज बंद केला जाईल व त्यानंतर ठराविक कालावधीने त्याबाबत माहिती घेतली जाईल.<br>समुपदेशक हे अर्जदार, गैरअर्जदार यांना समुपदेशन करून शेवटी ते प्रभारी अधिकारी यांचे समोर आणून योग्य ते समुपदेशन करून अर्जदाराच्या समस्येचे निराकरण करतील. |

| | |
|---|---|
| कायदेशीर सल्लागार | सदर आधार केंद्रातील कायदेविषयक सल्लागार हे पिडीतास कायद्याविषयी पुर्वकल्पना देतील व पिडीतास तिच्या कायदेशिर हक्काबाबत जाणीव करून देतील.<br>पिडीताची इच्छा असल्यास अत्याचार करणाऱ्यांविरूध्द कायदेशिर प्रक्रियेची सुरूवात करतील.<br>प्रकरण न्यायालयात दाखल झाल्यावर सुध्दा त्याचा पाठपुरावा करतील.<br>तसेच कायदेशीर प्रक्रिया सुलभ व सुकर करून पिडीतास कोर्टाच्या प्रत्येक तारखेस सुनावणीचे वेळी कोर्टात हजर राहण्याची सुट प्राप्त होण्याकरीता प्रयत्न करतील. |
| मानसोपचार तज्ञ | अत्याचाराने पिडीत महिलेस व तिचे परिवारास मनोवैज्ञानिक संबंधी सल्ला व मार्गदर्शन करून गरजेप्रमाणे सेवा देतील.<br>अत्याचाराने पिडीत महिलेचा पुर्व इतिहास तयार करतील व आवश्यकतेनुसार तिला चिकित्सा देतील. |
| वैद्यकीय सेवा | पिडीत महिला ही प्रतिकुल परिस्थितीत आधार केंद्रात आल्यास तिला आवश्यकतेनुसार वैद्यकीय सेवा पुरविण्यात येईल. पिडीत महिला ही लैंगिक अत्याचाराने प्रभावित असल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून इतर चाचण्या करवून घेतली जाईल. |
| संरक्षण अधिकारी | पिडीत महिलेस कौटुंबिक हिंसाचाराबाबत दावा दाखल करावयचा असल्यास मा. संरक्षण अधिकारी, महिला व बालविकास विभाग, यांच्याकडे जाणेबाबत समज दिली जाते. |
| महिला सहाय्य कक्ष येथे अर्जाव्यतिरिक्त इतर कामकाज पाहिले जाते. | महिला अत्याचाराबाबत पो.स्टे.ला दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची माहिती संकलीत करून वरिष्ठांना सादर करणे / पाठविणे.<br>अंतर्गत तक्रार समिती बाबतचे कामकाज महिला सुरक्षेच्या दृष्टीने मुलभूत उपाययोजनांचा आढावा घेणेबाबत नेमलेली समितीचे कामकाज<br>मनोधैर्य योजनेबाबतचे कामकाज<br>महिला सुरक्षिततेबाबतची माहिती संकलीत करून वरिष्ठांना सादर करणे/ पाठविणे.<br>शेल्टरत होम मध्ये समन्वय ठेवून गरजू महिलांना तात्पुरता निवारा उपलब्ध करून देतील. |
| गुन्हा दाखल करतानाची कार्यवाही | अत्याचाराने पिडीत महिलेच्या संदर्भात गुन्हा दाखल करताना सदरचे प्रकरण संबंधित पोलीस स्टेशनला योग्य त्या कलमाअंतर्गत गुन्हा दाखल करणेकामी पाठविणे. |

# शाळा-महाविद्यालयांतील मुलींनी घ्यावयाची काळजी

**शाळा-महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थिनींनी घराबाहेर वावरताना विशिष्ट नियम पाळावेत. जेणे करून गुन्हेगारी मनोवृत्तीच्या विकृत मानसिकतेला खतपाणी मिळणार नाही. मुलींनी तसेच त्यांच्या पालकांनीही काही नियम जाणीवपूर्वक पाळले तर महिलाविषयक गुन्ह्यांमध्ये निश्चितपणे फरक पडेल.**



- त्रास देणारी व्यक्ती नातेवाईक, शेजारी, जवळची असेल किंवा समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती असेल तर त्याबाबत कोणत्याही प्रकारची तमा बाळगू नये. आपण केलेल्या तक्रारीबाबत कोणी विश्वास ठेवणार नाही असा विचार करून तक्रार न करण्याचा निर्णय घेऊ नये. तात्काळ तक्रार करावी.

- रस्त्याने चालताना एखादा लहान मुलगा रडत आला व त्याने त्याचा घरचा पत्ता विचारल्याचे सांगितले तर त्याच्यासोबत त्याचे घर शोधण्यासाठी न जाता त्याला जवळच्या पोलीस चौकी, पोलीस स्टेशनला घेऊन जाणे. अपहरण करण्यासाठी लहान मुलांचा वापर करण्यात येतो.

- मुलींनी घराबाहेर फिरताना सजग राहावे. रात्रीच्या वेळी गर्दी नसलेल्या ठिकाणी निर्जन स्थानी जाऊ नये.

- शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थीनी पार्ट टाईम जॉबच्या शोधात असतात. वर्तमानपत्रातील जाहिराती बघून अर्ज करतात. परंतु अर्ज करण्यापूर्वी जाहिरातीसंबंधी सखोल चौकशी करणे अनिवार्य आहे. मुलींना जाळ्यात ओढण्यासाठी अशा प्रकारचे सापळे रचले जातात.

- उन्हापासून संरक्षण मिळविण्यासाठी तसेच फॅशन म्हणून चेहऱ्यावर स्कार्फ बांधण्याची फॅशन रुढ आहे. पण बऱ्याच मुली संध्याकाळी व रात्रीच्या वेळीही चेहऱ्यावर स्कार्फ बांधून फिरताना दिसतात. तसे करणे कटाक्षाने टाळावे.
- पालकांनी आपल्या पाल्यांचे मोबाईल फोन कॉल्स, मेसेज सतत तपासावेत. तसेच इंटरनेटचा वापर आपल्या पाल्यांकडून चुकीच्या पद्धतीने तर होत नाही ना याची खात्री करून घ्यावी.
- आपल्या पाल्यांचे मित्र/ मैत्रिणी कोण आहेत, त्यांची नावे, मोबाईल नंबर इत्यादी माहिती स्वत:जवळ ठेवावी.
- शाळा-महाविद्यालयांतील मुलींनी गैरवर्तनापासून दूर राहावे. आपली खासगी माहिती मुलांना देणे, एकांतात भेटणे टाळावे.
- एखादा मुलगा फोनवरून किंवा प्रत्यक्ष त्रास देत असेल तर लगेच आपल्या पालकांना, शिक्षकांना आणि पोलिसांना कळवावे. त्यामुळे त्यांना होणारा भविष्यातील त्रास, घातपात याविषयी प्रविबंधात्मक कारवाई करता येईल.

दिल्लीच्या 'निर्भया'वरील बलात्कार आणि त्यानंतर तिचा झालेला मृत्यू यामुळे सर्व देश ढवळून निघाला. देशव्यापी निदर्शने झाली. ही घटना अत्यंत संवेदनशील बनली.

सरकारनेही या घटनेची तातडीने दखल घेतली. बलात्कारविषयी कठोर पावले उचलली गेली. जानेवारी २०१३ मध्ये कायदा तयार झाला. त्यात पुन्हा संशोधन होऊन यापुढे बलात्काऱ्याला जन्मठेप/फाशी होऊ शकते.

कौटुंबिक हिंसाचार पीडित महिलांना कायद्याचे संरक्षण मिळू शकते. त्यांना वैद्यकीय मदत, निवारा, मोफत कायदेशीर सल्ला उपलब्ध आहेत. या सवलती उपलब्ध करून देणे हे केंद्र प्रशासन, राज्य शासनाचे कर्तव्य आहे. याप्रमाणे सेवादायी संस्था कार्यरत आहेत.

शेवटी महिलांनी स्वत:ची रक्षा स्वत:च केली पाहिजे. त्यांनी 'स्वयंसिद्धा' बनले पाहिजे !!

# टॅक्सी / रिक्षाने प्रवास करताना काय कराल?



- रिक्षा / टॅक्सीचा नोंदणी क्रमांक नीट वाचून घ्या. शक्य असेल तर मोबाईलमध्ये नंबरचा फोटो काढून घ्या.
- रिक्षा / टॅक्सीमध्ये बसल्यावर आपण तिचा नोंदणी क्रमांक व्हॉटस्‌ॲपवर आपले जवळचे नातेवाईक / मित्रांना पाठवा.
- आपण टॅक्सी / रिक्षाने येत जात असल्याबाबत नातेवाईक / मित्रांना मोबाईलवरून फोन करून माहिती द्या. त्यामध्ये आपण निघालेले ठिकाण, त्या गाडीचा नोंदणी क्रमांक व आपण किती वेळात पोहचू याबाबत माहिती सांगा.
- वरील माहिती देतांना शक्यतोवर मोठ्याने बोलून म्हणजे रिक्षा / टॅक्सी चालकाला ऐकू जाईल अशा आवाजात बोला.
- ऑटो / रिक्षा चालक वा इतर प्रवाशी यांचेकडील सिलबंद पाण्याची बॉटल किंवा कोणतेही खाण्याचे पदार्थ कधीही घेऊ नये.
- ऑटो / रिक्षा थांबवून चालकाने एखाद्या ठिकाणी चहा कॉफी वा इतर काही खाण्याचा आग्रह धरला असता तेथून तात्काळ निघून जावे.

# महिलांसाठी स्वरक्षा म्हणजेच सुरक्षा...

**महिलांना अधिक दक्ष व सज्ज राहण्यासाठी काही सूचना:-**

- घरी किंवा बाहेर कामासाठी माणसे, कारभार यांची निवड दक्षपणे करा. ओळखीच्या व्यक्तींनी शिफारस केल्याशिवाय इलेक्ट्रिशियन, एसी/टी.व्ही दुरुस्त करणारे कारागीर, रंगारी, प्लंबर अशा व्यक्तींना ते अनोळखी असतील तर त्यांना काम देऊ नका. त्यांच्याबद्दल आधी खात्री करून घेऊन मगच त्यांना काम द्या.
- घरी दीर्घकाळ एकट्याच राहणार असाल किंवा दार बंद करून बाहेरगावी जाणार असाल तर स्थानिक पोलीस ठाण्यात तसे कळवून ठेवा.
- घर, सोसायटी, वस्ती येथे कोणी संशयास्पद व्यक्ती रेंगाळताना, घुसखोरी करतांना दिसली तर त्यांची खबर पोलिसांना द्या.
- घरात दरोडेखोर घुसला तर आधी स्वत:चे रक्षण करण्याच मार्ग शोधा. अन्य एखाद्या खोलीत जाऊन आतून कडी लावा. मग पोलिसांना कळवा. आपला पत्ता नीट सांगा.



- शेजाऱ्यांशी संबंध चांगले ठेवा. त्यांना नेहमी मदत करा. मग तेही तुमच्या मदतीला धावून येतील. अडचणीत मदत करतील.
- स्थानिक पोलीस, पोलीस हेल्पलाईन, आणीबाणीच्या सेवा, शेजाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक हाताशी ठेवा. म्हणजे दुर्घटना घडल्यास तात्काळ संपर्क साधता येईल.

- झोपण्यापूर्वी सर्व दारे, खिडक्या नीट बंद करा.
- धोक्याचा इशारा देणारा अलार्म लावून घ्या.
- आपले कार्यालय, घर या परिसरात काही बाब संशायास्पद वाटल्यास उदा–कोणी अनोळखी व्यक्ती रेंगाळताना दिसली तर पोलिसांना त्वरित माहिती द्या.
- तुमच्या नेहमीच्या रस्त्यावर एखादी संशयास्पद तिऱ्हाईत व्यक्ती नेहमी दिसू लागली तर तुमचा मार्ग बदला. मार्गावर सुरक्षित ठिकाणी म्हणजे मैत्रिणी घर, सार्वजनिक जागा मनात नोंदवून ठेवा.
- ज्याची पुरती ओळख नाही अशा व्यक्ता आपला निवासी पत्ता, व्यक्तिगत दूरध्वनी/मोबाईल क्रमांक, ई–मेल याची माहिती देऊ नका.
- सेल्समन आल्यास त्याला कधीही घरात प्रवेश देऊ नका. घरात किती मंडळी आहेत, पतीची जाण्याची वेळ किंवा घरातील व्यक्ती (पती, सासरे, दीर) सतत बाहेर गावी असेल तर त्याबाबत चर्चा करू नका. तसेच प्लंबर, इलेक्ट्रीशियन वा इतर कामगार यांचेसोबतही अशा प्रकारची वार्तालाप करू नये.



# महिलांसाठी ६ सुरक्षेच्या सूचना



आपण कोणत्याही हल्ल्यास तोंड देण्यासाठी समर्थ नाही असा महिलांचा गैरसमज असतो. हा गैरसमज आधी काढून टाका. आत्मविश्वास बाळगला आणि मानसिक तयारी केली तर खालील ६ सूचनांचे पालन करा.

- **कडक शब्दांचा वापर–** कोणी व्यक्ती आक्रमकपणे तुमच्याकडे येत असेल तर हात उगारून, 'थांबा, मागे फिरा.' असे कडक आवाजात त्याला जोराने सांगा. म्हणजे तुम्ही घाबरलेल्या नाहीत आणि प्रतिहल्ला करायला तयार आहात हे त्या हल्लेखोराला वाटेल. हल्लेखोर अशा प्रतिकाराला तयार असणाऱ्याच्या वाटेला सहसा जात नाही.
- **सुरक्षेच्या साधनांचा वापर:–** एखाद्या डब्यात, पुडीत मिरपूड, तिखटाची पावडर ठेवून ती नेहमी जवळ बाळगा. कोलन वॉटर, सुगंधी द्रव्यांच्या फवाऱ्यांचाही अशा वेळी उपयोग होतो. त्यांचा वापर करता येतो. घरी अग्निशामक द्रवाचा, स्प्रेचा सुद्धा उपयोग होतो.
- **कोंडीची जागा टाळा:–** तुम्हाला कोंडीत पकडलं जाऊ शकेल अशा जागी तुम्ही असाल तर तेथून पटकन बाहेर पडा. कोंडी होणाऱ्या जागेत जाऊ नका.
- **दोघी–तिघींच्या सोबतीने फिरा:–** सुरक्षा ही व्यक्तींच्या संख्येवर अवलंबून असते. गर्दीच्या जागी मदत व साक्षीदार मिळू शकतात.
- **आत्मविश्वास दिसू द्या:–** चेहऱ्यावर नेहमी आत्मविश्वास दिसू द्या. अगदी असुरक्षित वाटत असेल तरी ते चेहऱ्यावरून किंवा देह बोलीतून व्यक्त होता कामा नये. असा विश्वास दर्शविणाऱ्या व्यक्तींच्या वाटेला सहसा गुन्हेगार जात नाहीत. म्हणून परक्या वातावरणातही आपण येथे परिचित आहोत असे दाखवा, तसेच वागा.
- **कोणी व्यक्तींच्या अस्तित्वाने –** किंवा तेथील वातवारणात अस्वस्थ वाटू लागेल तर अंतरात्म्याच्या आवाजावर विश्वास ठेवा व तेथून निघा.

# वाहनाने पाठलाग होत असेल तर



**तुम्ही पायी चालत असतांना कोणी कार किंवा दुचाकीवरून तुमचा पाठलाग करीत असेल तर खालील सूचना लक्षात ठेवा.**

- वाहन तुमच्या दिशेने येत आहे. त्याच दिशेने चालत राहा. म्हणजे पाठीमागून येणाऱ्याला तुम्हाला मागून ओढणे जमणार नाही.
- तुम्हाला दिशा विचारणाऱ्या वाहनचालकाच्या वाहनापासून सुरक्षित अंतरावर उभे राहा.
- वाहन तुमच्या पुढेच येऊन थांबले आणि तुम्हाला धोक्याची जाणीव झाली तर आरडा ओरडा करा म्हणजे आजूबाजूच्या लोकांना कळेल.

## तुम्ही गाडी चालविताना पाठलाग होत असल्यास

तुम्ही गाडी चालवीत असताना पाठीमागून गाडीने कोणी पाठलाग करीत आहे असे वाटू लागले तर प्रथम त्या गाडीची काही मिनिटे पाहणी करा आणि मगच निष्कर्ष काढा. गाडी काही वेळा वळवा. आता सार्वजनिक ठिकाणी थांबा. अजूनही गाडी तुमच्या मागेच असेल तर खालील सूचना लक्षात घ्या.

- जवळच्या रुग्णालयात, हॉटेल किंवा सार्वजनिक जागेकडे गाडी न्या. तेथील सुरक्षा रक्षकांस, स्वागतिकेस किंवा द्वारपालास त्याची माहिती घ्या.
- पाठलाग करणारी व्यक्ती (स्टॉकर) जो पर्यंत तुमच्या मार्गावर आहे. तोपर्यंत तुमच्या घरी जाऊ नका.
- रात्रीच्या वेळी पाठलाग होत असेल तर जवळच्या निवासी इमारतीजवळ जा व हॉर्न मोठ्याने वाजवत राहा. तो ऐकून आजूबाजूचे लोक, इमारतीतील रहिवासी बाहेर येतील व मदत मिळू शकेल.
- ११२ क्रमांकावर संपर्क करून पाठलाग करणाऱ्या वाहनाची माहिती द्या. जवळ कोठे पोलिसांची गाडी दिसते का हेही बघत राहा.

# महिलांना अटक करताना घ्यावयाची काळजी

**महिलांना अत्याचार प्रतिबंधाच्या संदर्भात व महिलांना सन्मानपूर्वक वागविण्याविषयी खालील प्रमाणे कारवाई पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून करण्यात येईल.**

१) अ) महिलांच्या व मुलींच्या तक्रारींबाबत पोलिसांकडून ताबडतोब चौकशी करून आरोपींना त्वरित अटक करण्यात येईल. त्यांच्यावर कायदेशीर प्रतिबंधक कारवाई करण्यात येईल. सदर तक्रारीमध्ये व्यवस्थित पुरावा गोळा करून तपासात काहीही विसंगती न ठेवता लवकरात लवकर अभियोग न्यायालयात दाखल करण्यात येईल.
ब) ज्या वेळेस महिलांना अटक करण्याची वेळ येईल किंवा महिला साक्षीदाराची विचारपूस करण्यात येईल. त्यावेळी महिला पोलीस अधिकारी/ कर्मचारी बंदोबस्ताला ठेवणे बंधनकारक आहे.

२) चौकशीचे व तपासाचे काम, महिला साक्षीदाराचे जबाब त्यांच्या घरी जाऊनच घेण्यात येतात. तसेच चौकशी किंवा तपासा दरम्यान प्रश्न/ माहिती विचारतांना ती त्यांना लाज वाटेल, त्यांचा अपमान होईल, त्यांच्या चारित्र्याबद्दल शंका निर्माण होईल किंवा एकूणच त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा येईल असे प्रश्न विचारता काम नये.

३) महिलांना व मुलींना जर अटक करावयाची असेल तर त्यांना सूर्यास्तानंतर अटक करण्यात येत नाही. पोलीस ठाण्यात आणले जात नाही. मात्र अत्यंत जरुरीचे असल्यास अपवादात्मक परिस्थितीत पोलीस ठाण्यावर आणल्यास त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्यासोबत राहण्याची परवानगी देणे बंधनकारक आहे.

४) महिला आरोपींना त्यांच्यासोबत राखून ठेवलेल्या कक्षात ठेवले जाते. स्वतंत्र कक्ष नसल्यास अभ्यागत कक्षात ठेवले जाते. त्यांना पुरुष कोठडीत ठेवण्यात येऊ नये.
अ) बलात्काराला बळी पडलेल्या स्त्रियांच्या मन:स्थितीचा विचार करून त्यांना सभ्यतेने व दयाळूपणे वागविण्यात येते. तसे त्यांचे जबाब घेताना असभ्य, अशिष्ट किंवा अश्लील भाषेचा वापर करण्यात येऊ नये. अशा स्त्रियांचे जबाब महिला पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या समक्ष नोंदविण्यात येतात.
ब) विवाहित महिलांच्या संशयित मृत्यू प्रकरणी जर त्या महिलेचे वय ३० वर्षांपेक्षा कमी व लग्न होऊन सात वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला नसेल तर साहाय्यक पोलीस आयुक्त/ उपविभागीय पोलीस अधिकारी हे भेट देऊन मृत्यूची कारण मीमांसा करतील.

# ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार



२१ व्या शतकात संयुक्त कुटुंब पद्धती मोडकळीला आली आहे. याची कारणे कोणती आहेत याचे विवेचन करणे येथे अशक्य आहे. एवढे मात्र खरे की आज वृद्धांची स्थिती फार केविलवाणी झाली आहे. तरुणाईला वृद्धांचे असणे अडचणीचे वाटू लागले आहे. ज्यांनी जन्म दिला. पालनपोषण केले त्यांचे म्हातारपणी पालन–पोषण, देखरेख करणे त्यांचे कर्तव्य आहे. पण हे तरुणाई विसरली आहे. त्यांना म्हातारे आई–बाप नकोसे झाले आहेत. हे वास्तव आहे. त्यांना आई–बापाचा पैसा पाहिजे आहे पण जबाबदारी नको आहे.

वृद्धांची समस्या जागतिक समस्या झाली आहे. आधुनिक युगात वृद्धांचे वयोमान वाढले आहे. त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड मनाला बोचते. म्हणून या समस्येचा गंभीरपणे विचार करणे जरूरीचे झाले आहे. सेवाभावी संस्था ही समस्या सोडविण्यासाठी झटत आहेत. शासनही ही समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

भारतात ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक साहाय्य मिळावे, त्यांचे पालनपोषण व्यवस्थित व्हावे म्हणून फौजदारी संहितेत तरतूद केलेली आहे. सन २००७ मध्ये आई–वडील व ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण व पालनपोषण अधिनियम २००७ (The Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act 2007) अंमलात आणण्यात आला आहे. या कायद्याची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- वरील नागरिक जे स्वत:च्या कमाईने किंवा असलेल्या संपत्तीने स्वत:चे पालन–पोषण करण्यास असमर्थ आहेत ते आपल्या मुलाच्या विरुद्ध किंवा नातेवाईकांच्या विरुद्ध पालन पोषणासाठी पोटगीचा

अर्ज करू शकतात.

- सदर कायद्यानुसार कोणी ही ज्येष्ठ नागरिक ज्यांच्या अंतर्गत आई-वडील, आजी-आजोबा आपल्या एक किंवा अनेक मुलांच्या विरुद्ध जे अज्ञान आहेत त्यांना सोडून दुसऱ्यांच्या विरुद्ध पालन-पोषणाकरिता अर्ज करू शकतात.
- ज्या ज्येष्ठ नागरिकांना मुले नाहीत अशा परिस्थितीत ज्या नातेवाईकांना ज्येष्ठ नागरिकांच्या मृत्यूनंतर त्यांची संपत्ती मिळणार असेल (हा नातेवाईक अज्ञान नसावा) त्यांच्या विरुद्ध पालनपोषणाकरिता आवश्यक पोटगीकरिता अर्ज करू शकतात.
- सदर अधिनियमात मुले या शब्दाच्या व्याख्येनुसार मुलगा, मुलगी, नात व नातू यांचा समावेश होतो. परंतु ते अज्ञान नसावेत.
- आई-वडील या शब्दाच्या व्याख्येनुसार आई-वडील अभिप्रेत आहेत. तसेच जैविक दत्तक, सावत्र आई-वडिलांचाही समावेश होतो.
- ज्येष्ठ नागरिकास सर्वांप्रमाणे सामान्य जीवन जगण्याचा अधिकार आहे.
- जेंव्हा एकापेक्षा जास्त नातेवाईकांना ज्येष्ठ नागरिकांच्या मृत्यूनंतर संपत्तीचा वाटा मिळणार असेल त्यावेळेस ज्येष्ठ नागरिकांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्या नातेवाईकांवर असते.
- पालन पोषणाकरिता आवश्यक अर्ज कोण करू शकतो?

  अ) ज्येष्ठ नागरिक, आई-वडील.

  ब) ज्येष्ठ नागरिक अर्ज करण्यास असमर्थ असेल अशा परिस्थितीत ज्या व्यक्तीस ज्येष्ठ नागरिक प्राधिकृत करेल किंवा एखाद्या संघटनेमार्फत अर्ज करू शकते.

  क) न्यायाधिकरण स्वत: एखाद्या प्रकरणात दखल घेऊ शकते.
- न्यायाधिकरण अर्ज दाखल झाल्यानंतर दावा प्रलंबित असताना पालनपोषणाकरिता आवश्यक निर्वाह खर्चांबाबत अंतरीम हुकूम मुले, नातेवाईक यांना देऊ शकते.
- न्यायाधिकरणाकडे अर्ज दाखल झाल्यानंतर त्या अर्जाबाबतची सूचना

मुले किंवा नातेवाईक यांना देण्यात येते व त्यांचे त्या अर्जावरचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर किती रक्कम निर्वाह खर्चाकरिता देणे योग्य राहील याबाबत निर्णय घेते.

- पालन पोषणाकरिता केलेल्या अर्जावर मुलांना किंवा नातेवाईकांना नोटिसांची बजावणी झाल्यापासून ९० दिवसांच्या आत सदर अर्जावर हुकूम होणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणांमुळे सदर मदत ३० दिवसांकरिता न्यायधिकरण वाढवू शकते. ५(४)
- पालनपोषणाकरिता झालेला हुकूम हा एक किंवा अनेक व्यक्तींविरुद्ध असेल अशा परिस्थितीत जर त्यातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास दुसऱ्या व्यक्तीवर असलेल्या जबाबदारीत काहीच परिणाम होणार नाही.
- न्यायाधिकरणाने दिलेला हुकूम जर मुले किंवा नातेवाईकांनी त्यांनी पाळला नाही तर अशा वेळेस न्यायाधिकरण देय असलेली रक्कम वसूल करण्याकरिता अधिपत्र काढते. सदर अधिपत्राची अंमलबजावणी झाल्यास देय असलेल्या पालन–पोषणाकरिता सर्व रकमेबद्दल किंवा



रकमेच्या कोणत्याही भागाबद्दल एक महिन्याच्या मुदतीपर्यंत अथवा त्या संपूर्ण रकमेचा भरणा होईपर्यंत त्या व्यक्तीला कैदेची शिक्षा ठोठावता येते.

- ज्येष्ठ नागरिक जो स्वत:चे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे व त्यांची मुले किंवा नातेवाईक पालनपोषणाची जबाबदारी घेण्यास नाकारत आहेत त्याबाबत न्यायाधिकरणाचे समाधान झाले असेल अशा वेळेस पालनपोषणाकरिता प्रत्येक महिन्याकरिता निर्वाहाची रक्कम निश्चित करणे.
- पालन पोषणाकरिता देण्यात येणारी रक्कम राज्य शासनाने ठरवून दिली असेल त्याप्रमाणे देण्याचे आदेश न्यायाधिकरण देऊ शकते. परंतु सदर रक्कम ही १००००/- प्रति महिना या पेक्षा जास्त नसावी.
- पालनपोषणाकरिता द्यायच्या रकमेबाबत न्यायाधिकरणाने हुकूम केल्यानंतर ३० दिवसांच्या आत किंवा न्यायाधिकरण जसे आदेश देईल त्याप्रमाणे रक्कम भरणे आवश्यक आहे.
- न्यायाधिकरणाने केलेल्या हुकूमाच्या विरूद्ध अपील करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्याकरीता एक अपिलीय न्यायाधिकरणाची राज्य शासनाने स्थापना करणे आवश्यक आहे.
- अपिलीय न्यायाधिकरणावर काम करणारी व्यक्ती जिल्हा न्यायाधीश पदापेक्षा कमी अर्हतेचा नसावी.
- न्यायाधिकरणाच्या हुकूमाच्या विरूद्ध ६० दिवसांच्या आत अपील करणे आवश्यक आहे.

**वृद्धाश्रमाची स्थापना**

- १५० ज्येष्ठ नागरिकांची राहण्याची व्यवस्था होऊ शकेल असे वृद्धाश्रम प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे असणे आवश्यक आहे.
- ज्येष्ठ नागरिकाला द्यावयाच्या सुविधा, आरोग्य, मनोरंजन याबाबतचे मानदंड ठरविण्याकरिता व देखरेखीकरिता राज्य सरकार एक योजना तयार करेल.

## ज्येष्ठ नागरिकांकरिता वैद्यकीय सुविधा

- सदर कायद्यानुसार सरकारी दवाखाने अंशत: किंवा पूर्ण अनुदान प्राप्त दवाखान्यास ज्येष्ठ नागरिकांकरिता पलंग व्यवस्था असणे आवश्यक आहे.
- ज्येष्ठ नागरिकांकरिता वेगळी रांग असावी.
- जुनाट, जीवघेणा आजार किंवा निकृष्ट अवस्थेत गेलेल्या आजाराकरिता ज्येष्ठ नागरिकांच्या सुविधांमध्ये वाढ करण्यात यावी.
- जुनाट आजारांवर करण्यात येणाऱ्या संशोधनात वाढ करण्यात यावी.
- निकृष्टावस्थेत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची देखरेख करण्याकरिता या आजारावर रुग्णास उपचार करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर नि:शुल्क उपचार करतील.

## ज्येष्ठ नागरिकांचे जीवन व सुरक्षा, संपत्ती यांचे संरक्षण

- ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणाप्रीत्यर्थ प्रचार व जागरूकता याबाबत दूरदर्शन, रेडिओ व मुद्रण माध्यमांचा उपयोग करून नियमित कालावधीत याबाबत प्रचार करावा.
- ज्येष्ठ नागरिकांकरिता असलेल्या कायद्याबाबत केंद्र सरकार, राज्य सरकार ज्यात पोलीस अधिकारी व न्यायिक अधिकारी असेल त्यांना सदर कायद्याबाबत जागृती निर्माण करण्याकरिता प्रशिक्षण देण्यात यावे.
- ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणाच्या योजना संबंधित मुद्यांचा विचार करण्याकरिता विधी विभाग, गृह, आरोग्य व समाज कल्याण विभागातर्फे नियतकालीन पुन:अवलोकन करण्यात यावे.
- ज्येष्ठ नागरीकांसाठी १०९० ही हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.



# स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांसंबंधी काही सर्वसाधारण समज
## (समज = स्पष्टीकरण)



**१) बलात्कार करणाऱ्या व्यक्ती अनोळखी असतात.**

**स्पष्टीकरण –** बलात्कार झालेल्या अनेक स्त्रियांना त्यांच्यावर बलात्कार करणाऱ्यांची शेजारी, नातेवाईक किंवा मित्र परिवारातील व्यक्ती म्हणून ओळख असते.

**२) बलात्कार रात्री उशिरा घडतात.**

**स्पष्टीकरण –** बहुतांश बलात्कार घरात होतात. त्यामुळे ते दिवसाच्या कोणत्याही वेळेस घडू शकतात.

**३) बलात्कार बहुधा मानसिक संतुलन बिघडलेल्या पुरुषांकडून घडतात.**

**स्पष्टीकरण –** हाही समज चुकीचा आहे. स्थिर बुद्धीचे पुरुष ही सावधपणे, योजनापूर्वक स्त्रीला जाळ्यात ओढून बलात्कार करतात.

**४) स्त्रिया उत्तान कपडे घालून पुरुषांचे चित्त विचलित करतात आणि बलात्काराला आमंत्रण देतात.**

**स्पष्टीकरण –**एका सर्वेक्षणात नागरी हक्कांच्या गटास आढळले की बलात्कार सहसा ग्रामीण स्त्रिया, आदिवासी व दलित स्त्रियांवर होतात. त्यांची वेशभूषा कधीच उत्तान नसते.

**५) मुलांचा कधीच लैंगिक छळ होत नाही.**

**स्पष्टीकरण –** मुलेच जास्त हतबल असतात. कुटुंबीयांकडून, नातेवाईकांकडून त्यांचा लैंगिक छळ होतो.

**६) मुले लैंगिक छळाची कल्पना करतात.**

**स्पष्टीकरण –** मुले लैंगिकतेबद्दल अनभिज्ञ असतात. त्यामुळे ते लैंगिक छळाची कल्पना कशी करू शकणार?

**७) पती–पत्नीच्या भांडणात मारहाण करायलाच पाहिजे.**

**स्पष्टीकरण –** भांडण मारहाणीनेच व्हायला पाहिजे असे मुळीच नाही. अनेकदा त्या स्त्रियांना इतके मारले जाते की त्यांच्या शरीरावर माराच्या खुणा कायम राहतात.

**८) पत्नीने काही केल्याशिवाय पती तिला मारत नाही.**

**स्पष्टीकरण –** पत्नीने पतीला चिडविले हे कारण समर्पक ठरत नाही. जेवण, चहा करणे, कपडे, संशय, पैसे न देणे, मुलांचे रडणे यापैकी किती तरी मारहाणीसंबंधी कारणे समोर येतात.

**९) स्त्रियांना मार खाण्यात गंमत वाटते.**

**स्पष्टीकरण –** कोणत्याही स्त्रीला सतत माराच्या दडपणाखाली राहणे किंवा मार सहन करणे शक्यच नसते. त्या आपल्या पतीवर अवलंबून असल्यामुळे त्या घराबाहेर पडू शकत नाहीत. त्या मुलांना पतीजवळ सोडू शकत नाहीत, इच्छित नाहीत. कदाचित त्यांना माहेरी घर किंवा इतर आधार मिळत नाही.

**११) दारूच्या व्यसनामुळे मारहाण होते.**

**स्पष्टीकरण –** हे एक कारण आहे. ते दारू पिऊन इतर पुरुषांना का मारत नाहीत? आणि दारू प्यालेले नसले तरी अनेक पुरुष स्त्रियांना मारहाण करताच ना!

**१२) मध्यमवर्गीय स्त्रियांना मारहाण होत नाही.**

**स्पष्टीकरण –** सर्व थरांतील स्त्रियांना मारहाण होते. पण असा समज आहे की, गरीब आणि कामगार स्त्रियांनाच मारहाण होते. मध्यमवर्गातील स्त्रिया आपल्या प्रतिष्ठेला जपण्यासाठी आपल्यावरील झालेल्या अत्याचारांची वाच्यता करीत नाहीत.

**१३) अत्याचाराबाबत पोलीस स्टेशनला माहिती दिल्यावर बदनामी होते?**

**स्पष्टीकरण –** पीडित व्यक्तीचे नाव गुपित ठेवले जाते. त्यामुळे बदनामी होण्याचा प्रश्नच नाही.

**१४) अत्याचारासंबंधी पो.स्टे.ला तक्रार नोंदविल्यास वृत्तपत्रे/मीडिया मध्ये नाव येते त्यामुळे बदनामी होते.**

**स्पष्टीकरण –** पीडित व्यक्तीचे नाव वृत्तपत्रे किंवा टीव्ही चॅनल यांना उघड करता येत नाही. तसेच पीडित व्यक्तीचा फोटो, ही प्रदर्शित करण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

**१५) कोर्टात केस चालताना आरोपीचे वकील उलटे-सुलटे प्रश्न विचारतात, तसेच सर्वांसमोर प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतात.**

**स्पष्टीकरण –** कोर्टास विनंती केल्यास खटला कोर्ट रूममध्ये न चालवता मा. न्यायालयाच्या स्वतंत्र कक्षात चालविला जातो.

● ● ●

# महिला अत्याचारांसंदर्भात महिलांना संरक्षण देणाऱ्या विविध कायद्यांमधील तरतुदीत शिक्षा

## भारतीय दंडविधानामधील विशेष तरतुदी

| कलम | अपराधाचे स्वरूप | शिक्षा | दखलपात्र किंवा अदखलपात्र | जामीनपात्र किंवा अजामीनपात्र | कोणत्या न्यायालयात संपरीक्षायोग्य |
|---|---|---|---|---|---|
| २२८ (अ) | कलम ३७६,३७६ (अ) (ब) (क) (ड) (इ) भा.दं.वि. या कलमाखाली बळी पडलेल्या व्यक्तीचे नाव किंवा मजकूर मुद्रित किंवा प्रकाशित करण्यास बंदी | २ वर्षांची कैद किंवा दंड | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| २२९ | स्त्रीकडे पाहून सार्वजनिक ठिकाणी अश्लील किंवा असभ्य हातवारे करणे/ गाणी म्हणणे. | ३ महिन्यांची शिक्षा किंवा दंड | अदखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| २९२ | अश्लील पुस्तक, पत्रके, लिखाण, विक्री, वितरण इत्यादी करणे. | २ वर्षे कैद किंवा २ हजार रू. दंड व पुनरावृत्ती झाल्यास ५ वर्षे कैद व ५ हजार दंड | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| २९३ | अश्लिल वस्तू २० वर्षाखालील व्यक्तीला विकणे | ३ वर्षे कैद व २ हजार रू. दंड व पुनरावृत्ती झाल्यास ७ वर्षे कैद व ५ हजार दंड | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| २९४ | सार्वजनिक ठिकाणी आश्लील कृती करणे | ३ महिने कैद किंवा दंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३०४ (ब) | हुंडाबळी | ७ वर्षे कैद ते जन्मठेप | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३०६ | आत्महत्येस चिथावणी देणे | १० वर्षे कैद व दंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३०९ | आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे | १ वर्षापर्यंत कैद किंवा दंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३१२ | जीव वाचवण्यासाठी गर्भपात करणे, गर्भस्त्राव नसेल तर | ३ वर्षे कैद किंवा दंड किंवा दोन्ही | अदखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ३१३ | स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात घडवून आणणे | १० वर्षे किंवा आजीवन कारावास व दंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३१४ | गर्भपात घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीमुळे स्त्रीचा मृत्यू घडून येणे | १० वर्षे कारावास किंवा जन्मठेप व दंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३१५ | मूल जिवंत जन्मण्यास प्रतिबंध केल्यास किंवा जन्मानंतर त्याच्या मृत्यू घडवून आणण्याकरिता केलेली कृती | १० वर्षे कारावास किंवा द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३१६ | सदोष मनुष्यवधाबद्दल दोषी होऊ शकेल, अशा कृतीमुळे स्पंदन पावणाऱ्या अज्ञात गर्भजिवाचा मृत्यू घडवून आणणे. | १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३१७ | १२ वर्षाखालील मुलाला त्याच्या आईवडिलांनी किंवा देखभाल करणाऱ्या व्यक्तींनी उघड्यावर टाकून त्याचा परित्याग करणे | ७ वर्षे कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३१८ | गुप्त रितीने मृतदेहाची विल्हेवाट लावणे, मूल जन्मले ते गुप्त ठेवणे | २ वर्षे कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ३२३ | पत्नीला मारहाण करणे, सामान्य जखमा | ५ वर्षे तुरुंग, १०,००० रु दंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ३२५ | पत्नीला मारहाण करणे, गंभीर जखमा | ७ वर्षे सजा दंड | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ३२६ (अ) | ॲसिड इत्यादीचा वापर करून स्वेच्छेने गंभीर दुखापत करणे | १० वर्षे ते आजीवन कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३२६ (ब) | स्वेच्छेने ॲसिड फेकणे किंवा फेकण्याचा प्रयत्न करणे | ५ ते ७ वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३४० | अवैधरीत्या ताब्यात घेऊन बंद करून ठेवणे. (अडथळा निर्माण करणे.) | १ महिना सजा ५०० रु दंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |
| ३४२ | अवैधरीत्या डांबून ठेवणे. | १ वर्षे सजा,१०० दंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५४ | एखाद्या स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्या अंगावर जाणे किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे | १ ते २ वर्षे कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही | दखलपात्र | अजामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |
| ३५४ (अ) | १) लैंगिक छळ<br>२) लैंगिकतापूर्ण शेरेबाजी करण्याच्या स्वरूपाची लैंगिक छळवणूक | १) ३ वर्षे वाढविता येईल इतका कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही<br>२) १ वर्ष वाढविता येईल इतका कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही | दखलपात्र<br>दखलपात्र | जामीनपात्र<br>जामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |
| ३५४ (ब) | विवस्त्र करण्याच्या उद्देशाने महिलेवर हल्ला करणे किंवा फौजदारी बळाचा वापर करणे | ३ ते ७ वर्षे कारावास किंवा व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |
| ३५४ (क) | चोरून अश्लील चित्रण करणे | पहिल्या अपराधास १ ते ३ वर्षे कारावास व द्रव्यदंड दुसऱ्या व त्यानंतरच्या अपराधास ५ वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र<br>दखलपात्र | जामीनपात्र<br>अजामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |
| ३५४ (ड) | चोरून पाठलाग करणे | पहिल्या अपराधास ३ वर्षे कारावास व द्रव्यदंड, दुसऱ्या व त्यानंतरच्या अपराधास ५ वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र<br>दखलपात्र | जामीनपात्र<br>अजामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |
| ३६३ | पळवून नेण्याबाबतचा अपराध | ७ वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३६४ | खून करण्यासाठी अपहरण करणे किंवा पळवून नेणे | आजीवन कारावास किंवा १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३६६ | विवाह करणे किंवा संभोग करणे इ. ची सक्ती करण्यासाठी पळवून नेणे किंवा अपहरण करणे | १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३६६ (अ) | अज्ञान मुलगी अपहरणासाठी पळविणे हा अपराध आहे. | १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३६६ (ब) | परकीय देशांतून गैरकामांसाठी मुलींची आयात करणे | १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३६९ | अल्पवयीन मुलींना त्यांच्याजवळील वस्तूची चोरी करण्याकरिता पळविणे | ७ वर्षे सजा, दंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ३७० | व्यक्तीचा अपव्यापार करणे, एखाद्या व्यक्तीचे शोषण करण्याचे उद्देशाने धमकीचा, बळाचा वापर करणे | १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | अदखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ३७२ | अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसायासाठी विकणे | १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३७३ | वेश्या व्यवसायासाठी अल्पवयीन मुलीची खरेदी करणे | १० वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७६ | बलात्कार करणे | ७ वर्षे ते आजीवन सश्रम कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३७६ (अ) | पीडित व्यक्तीचा मृत्यू घडवून आणल्याबद्दल किंवा पीडित व्यक्तीस कायमस्वरूपी गलितगात्र स्थितीत ठेवण्यास कारणीभूत झाल्याबद्दल शिक्षा. एखादी व्यक्ती जी सज्ञान आहे त्याच्याकडून बलात्कार झाला व त्यादरम्यान पीडित महिला मृत्यू पावली वा विकलांग झाली. | २० वर्षे ते आजीवन सश्रम कारावास | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३७६ (ब) | फारकतीच्या कालावधीत पतीणे आपल्या पत्नीशी लैंगिक संबंध ठेवले | २ ते ७ वर्षे कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३७६ (क) | प्राधिकार अलसेल्या व्यक्तीने लैंगिक संभोग करणे | ५ ते १० वर्षे सश्रम कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३७६ (ड) | टोळीकडून बलात्कार करणे | २० वर्षे ते आजीवन सश्रम कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३७७ | अनैसर्गिक अपराध | आजीवन कारावास किंवा १० वर्षे कैद व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | सत्र न्याय दंडाधिकारी |
| ३८४ | बलाद्ग्रहण | ३ वर्षे कैद किंवा दंड किंवा दोन्ही | दखलपात्र | अजामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४९३ | कायदेशीर विवाह झाल्याचा समज लबाडीने निर्माण करणे | १० वर्षे कैद व द्रव्यदंड | अदखलपात्र | अजामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ४९४ | पती किंवा पत्नी हयात असतानाच्या काळात पुन्हा विवाह करणे | ७ वर्षे कैद व द्रव्यदंड | अदखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ४९५ | ज्या व्यक्तीबरोबर नंतरचा विवाह झाला असेल तिच्यापासून पूर्वीच्या विवाहाची वस्तुस्थिती लपविणे | १० वर्षे कैद व द्रव्यदंड | अदखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ४९६ | कायदेशीर विवाह न करता कपटीपणाने आपला विवाहसंस्कार करून घेणे | ७ वर्षे कैद व द्रव्यदंड | अदखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ४९७ | परगमन | ५ वर्षापर्यंत कैद किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही | अदखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ४९८ | गुन्हेगारी उद्देशाने विवाहित स्त्रीस भुरळ पाडून नेणे किंवा पळवून नेणे किंवा अडकवून ठेवणे | २ वर्षे कैद किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही | अदखलपात्र | जामीनपात्र | कोणताही न्याय दंडाधिकारी |
| ४९८ (अ) | एखाद्या स्त्रीचे पतीने किंवा पतीच्या नातेवाईकाने तिला क्रूर वागणूक देणे | ५ वर्षपर्यंत कैद व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |
| ५०९ | स्त्रीचा विनयभंग करण्याचे उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव किंवा कृती करणे | १ वर्षे कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही | दखलपात्र | जामीनपात्र | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी |

# फौजदारी प्रक्रिया सुधारणा पुरवणी - २०१३

## महिलांच्या गुन्ह्यासंदर्भात विशेष माहिती (भा.दं.वि.)

(अ) कलम ३५४ शी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी पुढील नोंदी दाखल करण्यात येतील

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५४ | महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे. | १० वर्षांचा परंतु ५ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३५४अ | १) अवांछनीय शारीरिक स्पर्श संपादन करण्याचा प्रयत्न लैंगिक अनुग्रहाची मागणी किंवा विनंती, संभोगदर्शन/संभोगवर्णन दाखविणे, या लैंगिक छळवणूक | ३ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र | जामीनपात्र |
| | २) लैंगिकतापूर्ण शेरेबाजी करण्याच्या स्वरूपाची लैंगिक छळवणूक | १ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास किंवा द्रव्यदंड किंवा दोन्ही. | दखलपात्र | जामीनपात्र |
| ३५४ब | विवस्त्र करण्याच्या उद्देशाने महिलेवर हमला करणे किंवा फौजदारी बळाचा वापर करणे | तीन वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु ७ वर्षांपर्यंत वाढविता येईल इतका कारावास आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३५४क | लैंगिक वस्तू किंवा दृश्ये पाहून त्याद्वारे लैंगिक समाधान मिळविण्याची विकृती | पहिल्या अपराधसिद्धीसाठी १ वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु ३ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास आणि द्रव्यदंड | दखलपात्र | जामीनपात्र |
| | | दुसऱ्या व त्यानंतरच्या अपराधसिद्धीसाठी ३ वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु ७ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३५४ड | छुपा पाठलाग करणे | पहिल्या अपराधसिद्धीसाठी ३ वर्षांपर्यंत कारावास आणि द्रव्यदंड | दखलपात्र | जामीनपात्र |
| | | दुसऱ्या व त्यानंतरच्या अपराधसिद्धीसाठी ५ वर्षांपर्यंत कारावास आणि द्रव्यदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र |

## (अ) कलम ३७०शी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी पुढील नोंदी दाखल करण्यात येतील

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७० | व्यक्तीचा अपवापर करणे | ७ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु१० वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | एकापेक्षा आधिक व्यक्तीचा अपवापर करणे | १० वर्षांपेक्षा कमी नसेल,परंतु आजीवन कारावासा–पर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | अज्ञान व्यक्तीचा अपवापर करणे. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल,परंतु आजीवन कारावास पर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास. | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | एकपेक्षा अधिक अज्ञान व्यक्तीचा अपवापर करणे | १४ वर्षांपेक्षा कमी नसेल,परंतु आजीवन कारावासा–पर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास. | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | एकापेक्षा अधिक प्रसंगी अज्ञान व्यक्तीचा अपवापर केल्याच्या अपराधाची सिद्धदोषी ठरलेली व्यक्ती | आजीवन कारावास याचा अर्थ, त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत कारावास, असा असेल व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | अज्ञान व्यक्तीच्या अपवापरामध्ये लोकसेवकाचा किंवा पोलीस अधिकाऱ्याचा सहभाग असणे | आजीवन कारावास याचा अर्थ, त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत कारावास, असा असेल व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७०अ | अपवापर केलेल्या बालकाचे शोषण | ५ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु ५ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | अपवापर केलेल्या व्यक्तीचे शोषण | ३ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु ३ वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका कारावास आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |

| कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब,३७६-क, ३७६-ड शी संबंधित असणाऱ्या नोंदीऐवजी पुढील नोंदी दाखल करण्यात येतील. | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७६ | १) बलात्कार | ७ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु आजीवन कारावासापर्यंत वाढविता येऊ शकेल इतका सश्रम कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | १) पोलीस अधिकाऱ्याद्वारे/लोकसेवकाद्वारे किंवा सशस्त्र सेनादलाच्या सदस्याद्वारे किंवा तुरुंगाच्या किंवा सुधारगृहाच्या /अभिरक्षेच्या अन्य ठिकाणच्या किंवा महिलांच्या / बालकांच्या संस्थांच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणाऱ्या व्यक्तीद्वारे/ रुग्णालयाच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणाऱ्या व्यक्तीद्वारे बलात्कार आणि बलात्कार झालेल्या व्यक्तीबाबत विश्वस्त स्थानी असणाऱ्या किंवा प्राधिकृत असणाऱ्या व्यक्तीने /बलात्कार झालेल्या व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकाने केलेला बलात्कार. | १० वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु आजीवन कारावासापर्यंत वाढविता येऊ शकेल इतका सश्रम कारावास. याचा अर्थ, त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत कारावास, असा असेल आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७६अ | ज्यामुळे महिलेचा मृत्यू घडून येईल /ती कायमस्वरूपी गलितगात्र स्थितीत राहील अशा प्रकारे बलात्कार करणारी व्यक्ती. | २० वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु जो आजीवन कारावासापर्यंत वाढविता येऊ शकेल, इतका सश्रम कारावास, अर्थात त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत कारावास असा असेल, किंवा मृत्युदंड | दखलपात्र | जामीनपात्र |
| ३७६ब | फारकतीच्या कालावधीत पतीने आपल्या पत्नीशी लैंगिक संभोग करणे | २ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु ७ वर्षांपर्यंत वाढविता पत्नीशी येऊ शकेल इतका कारावासा व द्रव्यदंड | दखलपात्र परंतु केवळ पीडितेने तक्रार केल्यावर | जामीनपात्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७६क | प्राधिकार असलेल्या व्यक्तीने संभोग करणे | ५ वर्षांपेक्षा कमी नसेल, परंतु १० वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतका सश्रम कारावास आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७६ड | टोळीकडून बलात्कार करणे | २० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासा पर्यंत वाढविता येऊ शकेल इतका सश्रम कारावास. याचा अर्थ, त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत कारावास असा असेल आणि पीडीत व्यक्तीस प्रदान करावयाची नुकसानभरपाई. | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७६इ | पुन अपराधी | आजीवन कारावास, याचा अर्थ त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरित काळापर्यंत कारावास आणि मृत्युदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |

## फौजदारी / गुन्हेगारी कायदा (दुरूस्ती) अधिनियम २०१८

### १) कलम ३७६ नविन नोंदी दाखल करण्यात येतील

| कलम | अपराध / गुन्हा | शिक्षा | दखलपात्र किंवा अदखलपात्र | जामीनपात्र किंवा अजामीनपात्र |
|---|---|---|---|---|
| ३७६ | १) बलात्कार करणे | १० वर्षे ते आजीवन सश्रम कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २) पोलीस अधिकाऱ्याद्वारे / लोकसेवकाद्वारे किंवा सशस्त्र सेनादलाच्या सदस्याद्वारे किंवा तुरूंगाच्या किंवा सुधारगृहाच्या / अभिरक्षेच्या अन्य ठिकाणच्या किंवा महिलांच्या / बालकांच्या संस्थांच्या व्यवस्थापनावर किंवा स्टाफवर असणाऱ्या व्यक्तीद्वारे बलात्कार आणि बलात्कार झालेल्या व्यक्तीबाबत विश्वस्तस्थानी असणाऱ्या किंवा प्राधिकृत असणाऱ्या व्यक्तीने / बलात्कार झालेल्या व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकाने केलेला बलात्कार | १० वर्षांपेक्षा कमी नसेल परंतु आजीवन कारावासापर्यंत वाढविता येऊ शकेल इतका सश्रम कारावास म्हणजे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरीत काळापर्यंत कारावास, असा असेल आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| | ३) १६ वर्षाखालील महिलेवर बलात्कार | २० वर्षे ते आजीवन सश्रम कारावास म्हणजे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरीत काळापर्यंत कारावास असा असेल आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७६ ए बी | १२ वर्षाखालील महिलेवर बलात्कार | २० वर्षे ते आजीवन सश्रम कारावास म्हणजे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरीत काळापर्यंत कारावास असा असेल आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| **कलम ३७६ डी नंतर ३७६ डी ए, डी बी दाखल करण्यात येतील** | | | | |
| ३७६ डी ए | १६ वर्षाखालील महिलेवर टोळीद्वारे बलात्कार | आजीवन सश्रम कारावास म्हणजे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरीत काळापर्यंत असा असेल आणि द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७६ डी बी | १२ वर्षाखालील महिलेवर टोळीद्वारे बलात्कार | आजीवन सश्रम कारावास म्हणजे त्या व्यक्तीच्या नैसर्गिक जीवनाच्या उर्वरीत काळापर्यंत असा असेल आणि द्रव्यदंड किंवा मृत्यूदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |

# बुलडाणा जिल्हा पोलीस वरीष्ठ अधिकारी संपर्क क्रमांक

| वरिष्ठ अधिकारी कार्यालय | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|
| पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ऑफीस – ०७२६२–२४२३९५<br>नि.स्थान – ०७२६२–४२३०३ |
| अप्पर पोलीस अधीक्षक, बुलडाणा | ऑफिस – ०७२६२–२४४९२५<br>नि.स्थान – २४२४६६<br>ऑफीस – २०२ |
| अप्पर पोलीस अधीक्षक, खामगाव | ०७२६३ –२५२०४८ |
| पो.उपअधिक्षक (गृह) | ०७२६२ –२४२१०१ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर | ०७२६७ – २२२३६८ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, बुलडाणा | ०७२६२ – २४२३२६ |
| पो.उपअधिक्षक, अर्थिक गुन्हे शाखा, चिखली | ०७२६२ – २४२७३८ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी<br>देउळगावराजा, सिंदखेडराजा | ०७२६१ – २३१६५० |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, मेहकर | ०७२६८ – २२५९७५ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव | ०७२६३ – २५२१६७ |
| उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगांव जा. | ०७२४ – २४३४१११ |
| पोलीस उपअधिक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंध शाखा, बुलडाणा | ०७२६२ – २४२५४८ |

# बुलडाणा जिल्हा पोलीस संपर्क क्रमांक

| कार्यालय | एसटीडी कोड | दूरध्वनी | कार्यालय | एसटीडी कोड | दूरध्वनी |
|---|---|---|---|---|---|
| **उपविभाग बुलडाणा** | | | | | |
| बुलडाणा शहर | ०७२६२ | २४२३२७ | चिखली | ०७२६४ | २४२०६७ |
| बुलडाणा ग्रामीण | ०७२६२ | २४१२५५ | अमडापूर | ०७२६४ | २६४०३४ |
| बोराखेडी | ०७२६७ | २४५२२६ | धाड | ०७२६२ | २६५१३२ |
| धामणगाव बढे | ०७२६७ | २४१५४१ | रायपूर | ०७२६२ | २७००३० |
| **उपविभाग मेहकर** | | | | | |
| मेहकर | ०७२६८ | २२४५३६ | साखरखेर्डा | ०७२६४ | २६६०३८ |
| डोणगांव | ०७२६८ | २६६२४० | लोणार | ०७२६० | २२१३२१ |
| जानेफळ | ०७२६८ | २६२५३३ | बिबी | ०७२६० | २७१२५० |
| **उपविभाग देउळगांव राजा** | | | | | |
| देऊळगांव राजा | ०७२६१ | २३२००२ | किनगांव राजा | ०७२६९ | २६४४३३ |
| सिंदखेड राजा | ०७२६९ | २३४२४४ | अंढेरा | ०७२६१ | २६५०३३ |
| **उपविभाग खामगांव** | | | | | |
| खामगांव शहर | ०७२६३ | २५२०३८ | हिवरखेड | ०७२६३ | २६६६३६ |
| शिवाजी नगर | ०७२६३ | २५२१४२ | शेगांव शहर | ०७२६५ | २५२०१० |
| खामगांव ग्रामीण | ०७२६३ | २५२२९५ | शेगांव ग्रामीण | ०७२६५ | २५३०१० |
| पिंपळगांव राजा | ०७२६३ | २७१२३४ | जलंब | ०७२६५ | २७७५४२ |
| **उपविभाग मलकापुर** | | | | | |
| मलकापूर शहर | ०७२६७ | २२२०१८ | तामगांव | ०७२६६ | २३२२३२ |
| मलकापूर ग्रामीण | ०७२६७ | २२२२५८ | सोनाळा | ०७२६६ | २३८५३८ |
| नांदुरा | ०७२६५ | २२१०२८ | एमआयडीसी दसरखेड | ०७२६७ | २६२४०० |
| जळगांव जा. | ०७२६६ | २२१५३० | | | |
| **स्थानिक शाखा** | | | | | |
| आर्थिक गुन्हे शाखा | ०७२६२ | २४२७३८ | कल्याण शाखा/ सायबर सेल | ०७२६२ | २४७७६७ |
| स्थानिक गुन्हे शाखा | ०७२६२ | २४२७३८ | FRO/पासपोर्ट | ०७२६२ | २४१०४० |
| जिल्हा विशेष शाखा | ०७२६२ | २४१०४० | नियंत्रण कक्ष बुलडाणा | ०७२६२ | २४२४०० |